ओ८२८
302

## श्लोक.

अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
बाध्यमानोऽपि मद्भक्तो विषयैरजितेन्द्रियः ।
प्रायःप्रगल्भया भक्त्या विषयैर्नाभिभूयते ॥

## ओंवी.

सविता येतां प्राची जवळी । मावळे नक्षत्रमंडळी ।
तेवीं भक्तीच्या प्रबोधकाळीं । झाली होळी कामादिकां ॥
सप्रेम सद्भावें संपूर्ण । करितांचि नामस्मरण ।
वृत्ति पालटती आपण । तेंही वचन ऐकराया ॥

## श्लोक.

भक्तिः पुनाति मत्संस्था श्वपाकानपि संभवात् ।

## ओंवी.

सांडोनि दांभिक लौकिक । माझ्या भजनीं चोख ॥
तो जाति जरी झाला श्वपाक । तरी आवश्यक मज पूज्य ॥

---

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरं शुद्धमपापविद्धम् ।

१०७ इतिहास

नेहरू [illegible]माला

म. ग्रं. सं. ठाणे
य इतिहास
नं
सन-३८८४

श्री

# लेखरत्नमाला.

अथवा

## नानाफडणविसांचे निवडक पत्रांचा संग्रह

( गंगे सद्दर्शन दे श्री विष्णु-स्वामिभक्त नानातें
जगतोक माय तूं हें पूर्ण करु मनोरथास य: )
मोरोपंत-गंगावकिली.

हें पुस्तक

## अंताजी रामचंद्र हरडीकर

राहणार, महाड ता० मजकूर जिल्हा कुलाबा.

यांनी केलें तें

वासुदेव गणेश जोशी, चित्रशाळेचे व्यवस्थापक.
यांनीं "चंद्रिका" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

किंमत ६ आणे.

सन १८८७



श्री० सवाई माधवराव
यांचे मुख्य प्रधान
बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस.

# लेखरत्नमाला.

अथवा

## नानाफडणविसांचे निवडक पत्रांचा संग्रह

( गंगे सद्दर्शन दे श्री विष्णु–स्वामिभक्त नानातें
जगतोक माय तूं हें पूर्ण करु मनोरथास या नातें )

मोरोपंत–गंगावर्किली.

हें पुस्तक

**अंताजी रामचंद्र हरडीकर**

राहणार महाड ता० मजकूर जिल्हा कुलाबा.

यांनी केलें तें

वासुदेव गणेश जोशी, चित्रशाळेचे व्यवस्थापक.

यांनी "चंद्रिका" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

किंमत ६ आणे.

सन १८८७

## आर्या.

भानु कुळीं जन्मुनियां भानूसम सर्व मान्य जो झाला.
महाराष्ट्र देश भूषण ऐसें सर्वत्र बोलती ज्याला. १
महाराष्ट्र राज्यसूत्रें चातुर्यें बहुत दिन करीं धरुनी.
अत्यंत कीर्ति जेणें मेळविली राज्य शकट चालउनी. २
" ममऋण सत्वर फेडुनी द्या कोणी मजप्रती आहो मुक्ती"
देहावसान समयीं अशि माधव नृप मुखें निघे उक्ती. ३
तेव्हां सर्व अधोमुख पाहुन जो पुरुषवर पुढें झाला.
ऋण फेडुनि रायातें जेणें संतोष तेधवां दिधला. ४
पितृव्य राज्य लोभें नारायणराव पावतां मरण.
तें महदन्यायाचें कृत्य जयाला न जाहलें सहन. ५
त्या घोर पाप कर्में स्वमनीं अत्यंत होउनि क्रुद्ध.
घ्याया सूड तयाचा जो धैर्यें करुनि जाहला सिद्ध. ६
चातुर्यें चतुरांना मेळउनी सकल सिद्धता करुनी.
जो अधम पेशव्याला राज्यपदा वरुनि देत ढकलूनी. ७
नृप पत्नी गर्भवती नेउनियां जो पुरंदरीं ठेवी.
महाराष्ट्र वीर सारे आपुल्या पक्षाकडेस जो वळवी. ८
प्रसवे नव मासांतीं नृप भार्या जेधवां कुमाराला.
तेव्हां स्वकार्य सिद्धी मानुनियां हर्षयुक्त जो झाला. ९
बहु उत्साह जयानें आनंदें पुण्य पत्तनीं केला.
नृपपुत्र जन्म जेणें लोकांला रामजन्म वाटविला. १०
रायाच्या बालपणीं चातुर्यें राज्यभर शिरीं धरुनी.
बहु सौख्य जनां दिधलें ज्यानें रिपुवर्ग गर्व घालउनी. ११
महाराष्ट्र राज्य कार्यीं व्हावा आपुला प्रवेश हा हेत.
धरुन मनीं परदेशी जन झटले करुनियां उपायशत. १२
कपट प्रयत्न त्यांचे चातुर्यें जो हाणूनियां पाडी.
'महाराष्ट्र राज्य रक्षक' कीर्ति अशी जो दिगंतरीं धाडी १३
दुर्दैवें प्राणातें कंटाळुनि भूपती उडी टाकी.
तें दुर्वृत्त परिसतां घाबरुनी जो पडे बहू शोकीं. १४

परलोकां नृप जातां दुःखें जो शोक सागरीं पडला.
' बहु हाय झाला घात ' असें जो ह्मणूनिया रडला. १५
रघुनाथ पुत्र राजा होतां जाईल राज्य विलयाला.
मानून असें त्यातें टाळाया जो परोपरीं झटला. १६
युक्ति प्रयुक्ति रचितां गांठीं भरित्व तेधवां ज्याला.
करुनि पलायन वेगें गेला महाडास जो रहायाला. १७
आजन्म देश सेवा करुनी अत्यंत कीर्ति मेळवुनी.
जो परलोका गेला स्वजनांतें प्रीय फार होवोनी १८
आहे प्रख्यात जगीं जो नाना फडणवीस यानांवें.
ब्रह्मेख रत्नमाला बुध चरणीं मीं समर्पितों भावें. १९

---

# प्रस्तावना.

( गेला तो नृप ते प्रधान अवघे ते पंडितांची सभा.
गेली ते नगरी तशा शशिमुखी ज्या ' तप्तहेम ' प्रभा.
गेला तो नृप पुत्र त्या शुभकथा ज्यां देखिलें सर्वजें
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें काळास त्या वंदा जे.
वामन—वैराग्य शतक. )

आमच्या या भरतखंडांतील लोकांचे सर्व प्रकारें बरें वाईट करण्याचा मक्ता गेल्या शतकांत आकाशांतील देव बापानें, आपलीं आवडतीं लेकरें जीं आंग्लभौमबाळकें त्यांस एकदांच देऊन टाकला. त्यामुळें आमचें संरक्षण करणें, आह्मांस विद्यामृत पाजणें, आमच्याकरितां ग्रंथ तयार करणें, आह्मास इतिहास सांगणें, आह्मांस कलाकौशल्यें शिकविणें, फार काय! आह्मांसाठीं सर्व कांहीं करणें, आमच्या परदेशस्थ यजमानांकडे लागलें. त्यामुळें आह्मी क्रियाशून्य होत्साते स्तब्ध बसलों. सर्व प्रकारें भरपूर साधनें अनुकूळ असतां आम्हीं होऊन कोणती हाल चाल केली नाहीं, कारण परमेश्वरानें जर आह्मांस सप्तसमुद्रापार असणारे शहाणे लोक यजमान करून पाठऊन दिले, तर मग आपण होऊन उठाठेव करण्याची गरज आह्मांस काय राहिली? बहाद्दूर इंग्रेज इकडची बेबंद नगरी मोडून जे स्वामी बनले आहेत ते आमचें देशाचें सर्व प्रकारें कल्याणच करतील, व या कर्माचे अधिकारी तेच आहेत; असें मानून आह्मी स्वस्थ बसून राहिलों.

इंग्रेजांनीं या देशांतील सत्ता हातीं घेतांना संपूर्ण रयतेचें कल्याणच करण्याची जरी प्रतिज्ञा केली होती, तरी त्या प्रतिज्ञेचें त्यांस लौकरच विस्मरण झालें असें दिसतें. इतकेंच नाहीं तर मूळ संकल्प करतांनाच तो सिद्धीस नेण्याचा त्यांचा उद्देश नव्हता, असेंही वाटतें. त्यांनीं जें जें कांहीं केलें तेणेंकरून इकडील लोकांचे नैसर्गिक गुण व संपत्ति यांची वृद्धि न होतां उलट दुर्गुण व दारिद्र्य यांची मात्र देशांत वृद्धि झाली. ही गोष्ट प्रतिपक्ष पूर्वक सिद्ध करण्याचें हें योग्य स्थळ नाहीं सबब अभिप्रेत विषयाचे संबंधानें याचा थोडासा उहापोह करूं.

इतर सर्व गोष्टींप्रमाणें या देशांतील लोकांस त्यांचा खरा इतिहास

कळाविणें हें कामही बहादूर इंग्रजांकडेसच आलें. खऱ्या इतिहासाचीं सर्व साधनें त्यांस अनुकूळ होतीं; मग त्यांचा योग्य उपयोग करून घेऊन घडलेला खरा खरा प्रकार जगास कळविण्यांस त्यांस कोणी नको म्हटलें होतें ? उलटें तसें करणें हें त्यांचें कर्तव्य होतें, पण दुःखाची गोष्ट ही आहे कीं इंग्रज इतिहासकार आपले कर्तव्य कर्मापासून पराङ्मुख झाले. विजयमदें करून त्यांचे नेत्र फिरून गेले, दुराग्रहानें त्यांची मति भ्रंश पावली, व ते इकडील लोकांवर अकारण तुटून पडले. आपले सजातियांचें महात्म्य वाढऊन गरीब बिचाऱ्या हिंदूलोकांस त्यांनीं पाण्यापेक्षां पातळ करून टाकलें; शौर्य, धैर्य, उद्योग, राजकार्य, चातुर्य, इत्यादि गुणांची खरी जननी काय ती आंग्लभूमी; आणि आर्यभू, कापट्य, आलस्य, भीरुता, मूर्खत्व इत्यादि दुर्गुणांस प्रसवणारी. हें तत्व त्यांनीं सर्व जगभर प्रसृत केलें, हिंदू लोकांत शौर्य नाहीं, इंग्लंडांतला एक सोजीर हिंदुस्थानांतील एक हजार लोकांस मागें सारील, इकडच्या मोठ्या राजकार्य धुरंधरास तिकडचें एखादें शाळेंतलें पोर देखील सहज फसवील, असल्या कुत्सित कल्पना त्यांनीं लोकांचे डोक्यांत भरऊन दिल्या; आणि या सर्वांचें मोठें प्रमाण काय तर हिंदू लोकांनीं आपण होऊन आपलें राज्य गमावलें, अशी प्रसिद्धि त्यांनीं अवघ्या जगांत केली.

आतां वरील इंग्रज बहादुरांच्या कोट्या किती खऱ्या आहेत, तें सांगण्याची फारशी जरूर नाहीं. दुराग्रह पटलानें जो अंध बनला नसेल, त्याजला खरा प्रकार तेव्हांच दिसून येणार आहे कीं, आटलांटिक महासागरांतील एका बेटांतच साऱ्या सद्गुणांस पीक यावें, व हिमालयाचे पायथ्या पासून तों केप कन्याकुमारीपर्यंत यच्चयावत जागीं दुर्गुणांचे मोड रुजावेत, असा ' आकाशांतील देव बापानें ' ठरावच करून टाकला आहे, असें मानण्यास कांहीं कारण नाहीं. ज्या काळीं ग्रेटब्रिटन देश कोणास माहीत नव्हता, व ज्या काळीं इंग्लंडांतील लोक पशुंचीं कातडीं पांघरत होते, त्या काळीं हिंदु लोकांचें संपूर्ण जगावर वर्चस्व होतें. व त्यांचे विद्यादिकांचा सर्वत्रजयजयकार होत होता. कदाचित् इंग्लंड देशाचें नांव लोपून तो लहान टापू दुसऱ्या एखाद्या युरोपीय राष्ट्राच्या ताब्यांत आहे, व हिंदुस्थानांत इंग्रजी सत्ता झाली होती, ही गोष्ट इतिहासांत मात्र शेष आहे, अशी वेळ भविष्यकाळीं आली ! तरीही हिंदू लोकांचे प्राचीन

बुद्धिवैभव त्यावेळींही गर्जत राहील; यांत संशय नाहीं. हरिश्चंद्र, धर्मराज, कर्णार्जुन, यांची गोष्ट राहो, परंतु विक्रम, भोज्य, पौरस, इत्यादि प्राचीन, व शिवाजी, बाजीराव, माधवराव, इत्यादि अर्वाचीन नर रत्नें, ज्या खाणींत पैदा झालीं, त्या खाणीस कोळशांची खाण म्हणणें हें केवढें साहस? किंबहुना केवढा मूर्खपणा आहे, हें सांगावयास नकोच.

हिंदूनीं आपलें राज्य गमाविलें, असा त्यांजवर जबरदस्त आरोप आहे. पण या आरोपास एकटे हिंदूच पात्र आहेत काय? ज्यांचें राज्य जातें ते मूर्ख शिरोमणी असा नर सिद्धांतच केला तर वाखाणलेलीं अशीं किती बरें राष्ट्रें या आरोपांतून मुक्त होतील! ग्रीस, रोम, मिसर, कार्थेज, इत्यादि राज्य आज कोठें आहेत? 'नीचैर्गच्छत्युपरिच दशाचक्रनेमीक्रमेण' हा न्याय कोणास लागू नाहीं? काळाच्या ज्या भयंकर तडाक्यांत 'राम गेले युधिष्ठिर गेले विक्रमादित्य अस्तंगत झाले.' तेथें बिचाऱ्या शिवाजी बाजीरावांची कथा काय? फार कशाला संपूर्ण युरोपास हालऊन सोडणारा जो नेपोलियन बोनापार्ट, त्याजलाही 'दस्त' करणाऱ्या शूर वेलिंगटनाचें शौर्य आजला त्याचे किती देशबांधवांत आहे? तर हे सर्व विचार जो मनांत आणील, त्याजला दोनहजार वर्षांमागचें वैभव आज हिंदुस्थानांत आढळत नाहीं, ह्मणून केवळ हिंदू लोकांनाच नांव ठेवावें लागणार नाहीं.

वरील विवेचनावरून इंग्रजांनीं आमचा इतिहास बुद्धि पुरःसर खरा लिहिला नाहीं, व पुढेंही हें काम त्यांजकडून होणें अशक्य आहे, ही गोष्ट वाचकांचे लक्षांत येऊन चुकलीच असेल; तरी त्याचे पुष्टीकरणार्थ प्रत्यक्ष प्रमाणादाखल खुद्द इतिहास पुस्तकांस अनुलक्षून कांहीं मजकूर येथें दाखल करतों.

ऱ्हास पावलेल्या प्राचीन आर्य सत्तेचें पुनरुज्जिवन सोळाव्या शतकांत महाराष्ट्र देशांतील एका कोपऱ्यांत कसें झालें? व तेथून क्रमाक्रमानें त्याचा विस्तार साऱ्या भरतखंडभर कसा झाला? आणि महाराष्ट्रियांचें शौर्य, व बुद्धिवैभवरूप तेज दोन शतकें कसें चकाकत राहिलें होतें, तें सांगण्याची फारशी जरूर नाहीं, कारण त्या तेजाची मंदतर प्रभा अजूनही समूळ नाहींशी झाली नाहीं. मग असें असून या काळाचे इतिहास इंग्रजांनीं लिहिले आहेत त्यांत पाहूं जातां या अपूर्व तेजाचा कांहींच प्रत्यय दिसून येत नाहीं. 'हिंदुस्थानचा इतिहास' असें ठळकळीत सदर घालून लिहिले-

त्या मॉरिसचे इतिहासांत, एका तरी पेशव्याचें नांव आलें आहे काय? मराठ्यांची एक तरी मोहीम त्यांत वर्णिली आहे काय ? नाना फडणविसा-चा नुसता निर्देश तरी त्यांत यावयाचा होता ? पण कांहीं नाहीं ! ग्रंथकारानें आपली सारी करामत क्लैव, लारेन्स, लेक, मनरो, इत्यादि सजातीय महावीरांचे पोवाडे गाण्यांत खर्च करून टाकली आहे. ग्रांट डफनें मात्र पुष्कळ समंजसपणा धरून मराठ्यांचा इतिहास दिला आहे; तरी देखील जेथें जेथें इंग्रजांचा संबंध आला तेथें तेथें त्यांची लेखणी निवळ सत्यास-च धरून चालली नाहीं असें महाराष्ट्रीयांनीं लिहिलेल्या त्या वेळच्या लेखांवरून उघड होतें. तर इंग्रेजांचे हातून आपला खरा इतिहास आपणास कधींच मिळणार नाहीं हें मनांत आणून आपण होऊन आपला इतिहास तयार करून घेतला पाहिजे हें उघड आहे. इतिहासाचे अभ्यासाची अवश्यकता काय आहे ? तें सविस्तर सांगण्याची आजला गरज राहिली नाहीं. तरी आपले देशाप्रमाणें जो देश पूर्वकाळीं उच्च स्थितींत असून पुढें निकृष्ट स्थितींत आला असेल, त्या देशांत वैभव काळचे इतिहासाचा अभ्यास आस्थापूर्वक करणें जरूर असल्याचीं कांहीं कारणें येथें दाखल केलीं पाहिजेत.

कोणतीही गोष्ट कर्तव्य असतां करणाराचे ठायीं ती करण्याबद्दल उत्साह असावा लागतो. ‘ माझेठायीं ही गोष्ट करण्याचें सामर्थ्य आहे, उद्योग व ज्ञान यांचे बलानें मी ती करूं शकेन ’ अशी कर्त्याची खात्री असली पाहिजे, तरच ती गोष्ट कधीं काळीं सिद्ध होणार आहे. याचे उलट प्रकार जर असेल म्हणजे मला ही गोष्ट करतां येणार नाहीं, माझे बापाच्यानें जें झालें नाहीं तें मीं कसें करावें ! असें जर त्याचे मनांत घोळत असेल तर त्याचा पाय खचीत मागें येईल. यास्तव ज्या आम्हांस शौर्य, विद्या, कळा, इत्यादिकांचें अर्जन करून उच्च स्थितीस यावयाचें आहे. त्या आम्हांस आमच्या पूर्वजांचे पराक्रम व उत्कर्ष ऐकून हुरूप कां येणार नाहीं ! आमच्या पूर्वजांनीं ‘ कृष्णातीरच्या घोड्यांस सिंधुनदीचें पाणी पाजलें, ’ आमच्या पूर्वजांनीं ‘ यवन कुंजर शिरपर ’ चढाव करून, शत्रु गजगंडस्थलाचें विदारण केलें, आमच्या पूर्वजांनीं आपल्या अपूर्व बुद्धि प्रभावानें सकल शत्रूंस चाकित करून टाकून ‘ खुपशर्तीनें राज्य राखिलें’ व

परदेशस्थ शत्रूं कडून ' मराठा * म्याकिवेल ' ह्मणवून घेतलें, इत्यादि गोष्टी इतिहास ज्ञानानें आमचे मनांत पूर्ण ठसल्यावर पुढाळ कार्याविषयीं आह्मी उत्साह युक्त कां होणार नाहीं ? तसेंच पूर्वजांचीं चरित्रें वाचल्यानें जो एका प्रकारचा आनंद होतो, तोही इतिहास अवलोकनानें होणार आहे. ' निज पूर्वज चरितांहीं होय मुदित जेवि तो कथांनाहीं ' असें जें पंतांनीं ह्मटलें आहे तें अक्षरशः खरें आहे, तर आमच्या पूर्वजांच्या इतिहासाचा अभ्यास करणें, हें अत्यंत आल्हाद कारक, व लाभ दायक आहे, हें ध्यानांत आणून प्रत्येक हितेच्छु आर्यानें तो आस्था पूर्वक करावा हें योग्य आहे.

येथवर उपोद्घाता दाखल जे विचार मनांत आले, ते दाखल केले. आतां प्रस्तुत पुस्तकाबद्दल जो कांहीं प्रस्ताव करावयाचा, तो करावयास लागतों महाराष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचीं साधनें ह्मटलें ह्मणजे, जुन्या, बखरी, पत्रें, यादी तहनामे, वगैरे हीं होत. हे मौल्यवान् लेख सर्वत्रांचे उपेक्षा बुद्धीस्तव आजपर्यंत जागोजाग रद्दींत लोळत पडले होते. कित्येक तर वाळवेच्या भक्षस्थानीं पडले, कित्येक वाण्यांच्या दुकानीं जाऊन हिंग जिऱ्याशीं सामील झाले. कित्येकांचीं मुलांनीं तिखितें करून फाडून टाकलीं, व असाच प्रकार आणखी कांहीं दिवस चालला असता तर अशा प्रकारचे लेखांचा समूळ लोप होऊन गेला असता. परंतु सन १८७८ सालीं + तिघां उपपद धाऱ्यांनी ' काव्येतिहास संग्रह ' नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें. व तेणें करून जुन्या लेखांचें पुनरुज्जीवन होऊं लागलें. ' का० सं० ' कारांचे हे संपूर्ण महाराष्ट्रावर मोठेच उपकार आहेत. त्यानीं आपलें काम आज आठ वर्षें मोठे आस्थेनें व उत्तम प्रकारें बजाविलें आहे, व पुढेंही बजावीत आहेत. आणि त्यामुळें प्राचीन लेख बुडण्याची भीति नष्ट होऊन त्यांस चिरस्थाइत्व आलें आहे, इतकेंच नाहीं तर भावी इतिहा-

---

* ' म्याकिवेल ' हा इटाली देशांत अति विख्यात प्रधान होऊन गेला. हा कुटिल राजनीतींत अति निपूण होता. वरील उल्लेख नाना फडणविसांचे संबंधानें इंग्रज लोकांनीं केला आहे. हें बहुतेकांस माहीत आहेच.

+ गा० साने व मोडक, या दोघांचेच नांवानें सदर पुस्तक प्रसिद्ध झालें परंतु कै० गा० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचाही त्याचे कर्तृत्वांत हात आहे हे लौकरच समलें.

सकारास उत्तम सामग्रीची त्यापासून सिद्धता झाली आहे. सांगावयाचें इतकेंच कीं आमचे प्रस्तुत पुस्तकाचा उपक्रम या पुस्तकापासून झाला आहे. संग्रहाचे अंक आमचे वाचण्यांत येऊं लागतांच असे प्रकारचे जुने लेख मिळविण्याची आम्हांस इच्छा उत्पन्न होऊन आम्ही शक्यनुसार त्या उद्योगास लागलों. व त्या कामीं आम्हांस बरेंच यश आलें. पुष्कळ लेख आम्हांस मिळाले; व आणखीही मिळण्यासारखे आहेत. आम्हीं मिळालेले लेख का० सं० कर्त्यांकडे पाठविले. त्यांनीं मेहेरबानीनें ते सवडीप्रमाणें प्रसिद्ध केले. व कांहीं हल्लीं प्रसिद्ध होत आहेत.

थोडे दिवसांपूर्वीं नाना फडणवीस यांनीं लिहिलेलीं सुमारें दोनशें अस्सल पत्रें आमचे हातीं आलीं. नानां सारखा राजकार्य चतुरपुरुष या देशांत आजवर झाला नाहीं. अशी ख्याति सर्वतो मुखी आहे. ज्यानें कधीं पुण्याची वेस ही पाहिली नाहीं, किंवा नानाच्या चरित्राचें एक पानही उलटलें नाहीं, असा मनुष्य ही नानाच्या चातुर्याच्या गोष्टी मोठ्या डौलानें सांगत असतो. मग खुद्द नानांनीं लिहिलेल्या राज कारण संबंधी पत्रांत काय बहार असेल तें सांगणें नकोच. हीं बहुतेक पत्रें राजकारण संबंधीं आहेत. महदजी शिंद्याचे दरबारांत नानां कडून *नारो शिवदेव नांवाचे वकील होते त्यास व कांहीं, त्यांचेच दुसरे जोडीदारांस व कांहीं खुद्द पाटीलबोवांस गेलेलीं हीं पत्रें आहेत. या सर्व पत्रांत नानांचें बुद्धि सर्वस्व साठवलेलें आहे. मराठ्यांचे इंग्रेजांशीं युद्ध सुरू होतें, व महादजीचे मार्फत पुणें दरबाराशा तह ठरत होता त्याच कालाचे सुमारास हीं पत्रें लिहिलीं असून त्यांतील विषय ही बहुत करून तोच आहे. हीं सर्व पत्रें अथ पासून इतिपर्यंत वाचण्या लायक आहेत. सबब आम्ही तीं चालीं प्रमाणें का० सं० कर्त्यांकडे पाठविलीं. व त्यांज कडून जानेवारी १८८४ चे अंका पासून तीं दर अंकांत थोडीं थोडीं

---

* या नारोपंता बद्दल विशेष माहिती आम्हांस अद्याप मिळाली नाही तो वांईकडील राहणारा होता असें कित्येक लेखावरून दिसतें. हा फार शाहणा हुशार व नानांचा अति विश्वासू होता असे बद्दल अनेक प्रमाणें आढळतात. निबंधमाला अंक ८२ यांत महादजी शिंद्याचा अधिकारी होता. असें लिहिलें आहे. तें चुकीचें आहे. विद्वान माला कारांनीं सरासरी अनुमान धपक्या वरूनच सदरील उल्लेख केला आहे असें दिसतें.

छापण्यांत येत आहेत. तीं अवश्यमेव वाचण्या विषयीं आमची सर्वांस शिफारस आहे.

हीं सर्व पत्रें एके ठिकाणीं वाचण्यास मिळावीं हें फार अगत्याचें आहे. परंतु का० सं० पुस्तकांत तशी सोय नाहीं व तें पुस्तक नेहमीं घेण्याचें सर्वत्रांसच सामर्थ्यही नाहीं. यांतील कांहीं लेख तर प्रत्येक महाराष्ट्रियांनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. सबब सदरहू पत्रें का० सं० हांत फुटकळ छापतात, तसें न करितां आह्मी ती विषयानुरोधानें लावलीं; व त्यांतील अति महत्वाचे लेख निवडून काढिले. आणि प्रत्येक लेखा संबंधानें शक्त्यनुसार थोडी बहूत माहिती देऊन हें पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें ह्मणून, कमी किमतीस देतां यावें असे प्रकारें तयार करून आमच्या प्रिय महाराष्ट्र बांधवांस सादर केलें आहे. यांतील लेखांसंबंधानें आणखी बऱ्याच ठिकाणीं इतर ऐतिहासीक माहिती द्यावयास पाहिजे होती, असें आह्मास वाटतें; परंतु आम्हांस असावी तितकी वेळाची अनुकूलता नाहीं. व इतिहासाचें अध्ययनही आमचें बेताबाताचेंच आहे, हें कळविण्यास आम्हांस शंका वाटत नाहीं. या न्यूनतेमुळें मूळ लेखांस यत्किंचित ही कमीपणा येत नाहीं. असें जाणून आह्मी तिकडे विशेष लक्ष पुरविलें नाहीं तथापि हें आमचें पुस्तक आमुच्या देशबंधूंस पसंत पडून त्याची द्वितीयावृत्ति काढण्याचाच प्रसंग आल्यास ही न्यूनता नाहींशी करण्यास आम्हां कमी करणार नाहीं. असें आज खात्रीपूर्वक सांगून ठेवतों.

या पुस्तकांत उतरून घेतलेले लेख जसेचे तसेच घेतले आहेत, वाक्य रचना व शब्द वगैरे यांत बहुधा फेर केला नाहीं क्वचित ऱ्हस्व, दीर्घ. अनुस्वार, यांत अर्थबोध होण्यास्तव, फरक केला आहे. नवीन रीती प्रमाणें विराम चिन्हांचा उपयोग केला आहे. दुर्बोध शद्बांचा अर्थ जेथल्या तेथें द्यावयाचा; परंतु तसें न करितां सरतेशेवटीं त्यांची अर्थसह निराळी यादी दिली आहे. % तींत या पुस्तकांत न आलेलेही कांहीं शब्द घातले आहेत. याचें कारण असें कीं या यादीचा उपयोग या पुस्तकाचे वाचकांसच न होतां असे प्रकारचे सर्व जुने लेख वाचणारांस व्हावा. असा आमचा हेतु आहे. तथापि या यादीनें आमचा हेतु पूर्णपणें तडीस गेला आहे असें नाहीं; परंतु त्यापासून वाचकांस जुन्या

लेखांत वारंवार येणारे बहुतेक शब्द कळतील असा भरंसा आहे. शब्दांचे अर्थ लिहिण्यास का० सं० वरून फार मदत झाली आहे हें ही येथें कळविणें जरूर आहे.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं आमचे मित्र रा० रा० गोविंद रामचंद्र केळकर इंग्लिश टीचर महाड यांनीं आम्हांस फार मदत केली आहे. ही गोष्ट येथें दाखल करण्यास आम्हांस फार आनंद होत आहे. यांचेच श्रमानें नानांचीं प्रस्तुतचीं पत्रें उपलब्ध झालीं आहेत नाहीं तर तीं सर्व वाळवेच्या भक्षस्थानीं लौकरच पडलीं असतीं.

असो तर ही प्रस्तावना बरीच लांबल्या बद्दल वाचकांची माफी मागून हा प्रस्ताव पुरा करतों.

महाड ता० मजकूर जिल्हा कुलाबा. } अंताजी रामचंद्र हरडीकर

ताजाकलम. हेंपुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचे कामीं रा० रा० वासुदेव गणेश जोशी, चित्रशाळेचे व्यवस्थापक यांनीं आम्हास मदत केली व नानांची तसवीर यास जोडली सबब आम्ही त्यांचे फार अभारी आहों. पु.क.

# भाग १ ला.

## नानांचा इंग्रजांविषयीं अभिप्राय.

( न पादपोन्मूलन शक्तिरंहः
शिलोच्चये मूर्छति मारुतस्य ॥
कालिदास–रघुवंश )

अनिवार राज्य लोभानें बुद्धिहीन झालेला राघोबादादा साह्य मागण्याकरितां, स्वकीय, सोयरे, जातिबांधव, या सर्वांस सोडून, परधर्मी परजातीय, व परदेशस्थ अशा इंग्रेजांकडे गेला असतां, त्यांनीं त्याचें मोठ्या उत्साहभरानें अभिनंदन केलें व महाराष्ट्र राज्यरूप इमारतींत शिरण्यास, हा मोठाच दरवाजा आपणांस सांपडला असें त्यांनीं मानून, मूर्ख राघोबास गोडगोड थापांनीं आपलासा करून टाकिला. पुण्यपत्तनस्थ महाराष्ट्र राज्यकार्य धुरंधरास कस्पटाप्रमाणें समजून, आपले बाहुबलाचे भिस्तीवर राघोबास राज्यपदाचा टिळा लावण्याकरितां त्यांनीं समरांगणीं मराठ्यांशीं गांठ घातली. परंतु ' हरहर ' शब्दाचा घोष करून भगवा झेंडा फडकावणाऱ्या, मराठ्यांच्या खडतर भाल्यापुढें ' हडेलहप ' वाल्यांच्या संगिनींचें कांहीं न चालून, निर्बल मानलेल्या पुणें दरबाराशीं तह करण्याचें बहादर इंग्रेजांस भाग पडलें. हा तह महादजी शिंद्याचे मार्फत ठरला. तहाचीं कलमें ठरविण्याकरितां कलकत्त्याहून अंडरसन ( ज्यांस पुढील लेखांत ' इंद्रसेन ' असें ह्मटलें आहे तो. ) वकील शिंद्याकडे आला होता. नाना फडणविसानें तहाचीं पुष्कळ कलमें सांगितलीं त्यांपैकीं कांहीं इंग्रेजांनीं मान्य केलीं. व कांहींबद्दल नानांनीं फार आग्रह न धरितां सोडून दिलीं. परंतु एका गोष्टीबद्दल मात्र नाना दृढ निश्चय धरून बसले. ती गोष्ट राघोबास स्वाधीन करून देण्याबद्दल होय. राघोबा हा घरचा भेद्या आहे, त्याजला पर-देशस्थाकडे ठेवावयाचा नाहीं. असा नानांचा कृतसंकल्पच होता. व राघोबास हातचा जाऊं देणें हें इंग्रेजास मर-

णप्राय दुःखद होऊं लागलें. तसें न होऊं देण्यावद्दल इंग्रज फार झटले.* दादास हस्तगत करून घेण्याबद्दल नानांचा कसा निश्चय झाला होता, व इंग्रेजाचे कावे जाणून, त्यांनीं कशीं उत्तरें दिलीं, व एकंदरींत इंग्रजां-बद्दल नानांचा काय अभिप्राय होता, त्याविषयीं नानांचे खालील लेख पहा.

इंग्रजाचे सचोटीबद्दल नानांचा काय अभिप्राय होता तो त्यांनीं खा-लील पत्रांत स्पष्ट लिहिला आहे. तो वाचा.

---

' राजश्री नारोपंत[१] स्वामीचे शेवेसीं.

विनंती उपरी ' राजश्री पाटील बावांकडे इंग्रजांचा संदर्भ आला आहे कीं आह्मांस मावारे जाऊंद्या[२] ह्मणतात. पक्कें लिहिलें येईल तें लिहून पा-ठवीन, ह्मणोन पूर्वीं तुम्हीं लिहिलें होतें त्यास इंग्रज दगाबाज आहेत. खासा पाटीलबावा चालून आले, नथ भारी पडला, मैदानांत आले पे-चांत येऊं, याकरितां संदर्भ लाऊन बचाव करून मावारें जावें, फौज चोंहोंकडे गेली ह्मणजे पुढें येऊन, भूपाळवाले वगैरे मिळऊन घेऊन, मसलत करावी. असें करतील इकडील इंग्रजाविशीं आमची हिंमत पक्की आहे. व फौज सरंजामही आहे, असो, जें होणें तें श्रीमंताचे प्रतापें होईल. आमच्यानें काय होणें ? परंतु मैदानांत इंग्रज आला तर काय घडेल तें खरें. या इंग्रजाचे पारपत्यास सरंजाम आहे इकडील काळजी न करावी–तिकडील इंग्रजाचे संदर्भ वगैरे येतील.' ते कदापि ऐकूं नयेत. पारपत्यच व्हावें. तिकडील मैदानही मोठें आहे. इकडील[३] मैदान वड-गांव पासून पुणें बारा कोस. पैक्याची अडचण भारी यास मात्र ला-चार आहों. श्रीमंतांचें दैव आहे. चिंता नाहीं. रा छ २३ रविलावल हें विनंती.'

---

* या वादांत अखेरीस नानांनीच आपला आग्रह सिद्धीस नेला. व दा-दांस कुटुंबसुद्धां आपले स्वाधीन करून घेतलें. आणि त्यांस निर्वाहापुरती नेमणुक करून देऊन कोपरगांवीं ठेविलें. व थोडे दिवशीं तेथेंच दादांचा अंत झाला.

१ हे नानांचे शिंद्याकडील वकील.

२ घालणें. ३ इकडील इंग्रज-पुणें प्रांतीं आलेलीइंग्रेजी फौज. या फौजेचें अधिपत्य जनरल गाडर्ड ( गाडर ) याजकडे होतें.

अंडरसन साहेब शिंद्याकडे आल्यानंतर तहाचें बोलणें सुरू झालें. तो तहनामा कसा पुरा करावा. याबद्दल महादजीबोवांस गेलेलें खालील पत्र वाचा.

---

' राजश्री पटील बावा गोसावी यासी.

आशिरवाद विनंती उपरी आपण छ० शवाल व छ० २४ व छ० २७ जिलकाद तीन रवानग्यांची पत्रें पाठविलीं. ते पावलीं. ' * पूर्वी कलमबंदीचे यादींचीं उत्तरें राजेश्री नारोशिवदेव याजकडे आपण पाठविलीं व रामजी जाधव यानीं लिहिलीं तीं पत्रें पावल्यावर हल्लीं आपणा कडून निदान पक्षाची याद कलमवार आली. सवीस कलमें लिहिलीं त्यापैकीं अर्धाक उणीं काय पडतात. त्याचें बोलणें नारोशिवदेव येथें आलें. त्यांशी बोलून कलमवार पत्रें लिहिलीं आहेत. व मशार निल्हे हो लिहितील. त्यावरून सविस्तर कलमें आपल्या कडून दोन रवानग्यांचीं पत्रें आलीं त्यांत तह कर्तव्य किंवा न कर्तव्य त्यांतून कोणता ही स्पष्ट अर्थ दृष्टी पडत नाहीं. येथंतर इंद्रसेन निरोपाची उतावळी करतो. त्यास येथें येऊन आठ नऊ महिने होन आले. तह प्रकरणीं बोलणीं बोलून चार महिने झाले. या करितां कलकत्याहून * हेष्टीन यानें इंद्रसेनास लिहिलें आहे. ' तहाचा जाबसाल होत नसला तर उठोन येणें ' त्यास एक महिन्यांत तहनामा पुण्याहून आणवितो असें ह्मणोन करार केला आहे. त्यास पेशजी तहनाम्याची पारशी कलमबंदीची याद पाठविली आहे. त्याप्रमाणें तहनामा सरकारचा लिहून त्याजवर शिक्का करून पाठवावा. व दुसरे कोरं * डौलावर शिक्का करून पाठवावा. म्हणजे इंद्रसेनास दाखऊन हल्लीं आपण निदान पक्षाची याद लेहून पाठविली आहे. त्याप्रमाणें कलमं करारांत आणून कागदावर लिहून द्यावयास येईल. व त्या अन्वयें त्याजपासूनही कंपिनीचे मोहोरेनशी लेहून घेऊं. इंद्रसेन जावयाची जलदी करतो त्यास

---

* येथपासून अवतरण पुरें होई पर्यंतचा मजकूर शिंद्या कडील आलेल पत्रांतील जमा धरला आहे. हे लक्षांत ठेवावें. २ हा शिंद्याचे मार्फत पुण्यास असे.

* वॉरन हेस्टिंग्स गव्हरनर जनरल.

* डौल शिक्का केलेला कोरा कागद

शिक्यानशीं तहनाम्याची याद येईल ती दाखऊन मग हल्लींचे यादीप्रमाणें जावसाल बोलावयास चार दिवस आधिक लागले तर चिंता नाहीं. निरोपाची जलदी करतो ते करणार नाहीं. याद शिक्याची न आलीयास त्यास तह होईल असा भरंवसा पुरवत नाहीं. याकारितां पेशजी कलमबंदीची याद पाठविली आहे. त्याप्रमाणें लिहून वर शिक्का करून व दुसरे डौल शिक्यानशी याप्रमाणें दोन पाठऊन द्यावी. ह्मणजे हल्लीं कलमें लिहिल्या अन्वय इंग्रजाचे आपले जावसाल परस्परें सुधारून डौलाचे यादीवर लिहून त्यापासून लिहून घेऊन मग त्यास द्यावयास येईल. कलमबंदीची याद शिक्यानशीं येईल ते आम्हाजवळ राहील' + ह्मणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. राजश्री नारो शिवदेव यांणीं ही सविस्तर पत्रें पाठविलीं त्यावरून सर्वार्थ समजले. त्यास आपले लिहिल्यावरून पेशजी आपणांकडून पारशी याद कलमवार आली. त्याप्रमाणें सरकारचा तहनामा शिक्यानशीं करून पाठविला आहे. व डौलही शिक्का करून पाठविले आहे. परंतु बशर्त श्रीमंत राजश्री दादासाहेब *कुटुंब सुद्धां इंग्रजानीं स्वाधीन करावे. व वरकड कलमें येथून निदान पक्षाची याद पाठविली होती त्यापैकीं कलमें इंग्रजाशीं बोलण्यात येऊन हल्लीं लिहून पाठविली व याहून जेथवर साधतील तीं साधून घेऊन डौलावर कलम बंदी लेहून कलकत्याचे कंपिनीचे मोहरेनशीं व तेथील कौंसलदार[1] यांच्या दस्कतानशीं तहनामा त्याचा घेऊन उत्तमपक्ष इंद्रसेनानें येथें येऊन ध्यावा. नाहीं त्यापक्षी आपण ही तेथें द्यावा. इंग्रजाचे तहाचें काम बारच नाहीं बहुत जपून संभाळून करावें. सविस्तर नारो शिवदेव यांस लिहिलें आहे त्याजवरून कळेल. हैदरखानाचे मजकूर सविस्तर नारोपंतास लिहिले आहे त्याप्रमाणें इंग्रजाशीं बोलून पक्कें करारांत आणावें ता० छ१९ मोहरम. बहुतकाय लिहिणें लोभ असो दिजे हे विनंती.

दादांस स्वाधीन करून घेण्याबद्दल नानांचा निग्रह व त्याबद्दल इं-

---

+ येथें शिंद्यांचे पत्रांतील मजकूर पुरा झाला.

* जेथें जेथें दादांचा संबंध येतो तेथें तेथें 'कुटुंबसुद्धां' हे शब्द नानांचे पत्रांत येतातच. दादांचे कुटुंब ह्मणजे प्रख्यात आनंदीबाई इला मोकळी न राहूं देण्याबद्दल नानांचा फार कटाक्ष होता. त्यांचे कारण सांगावयास नकोच.

१ कौन्सीलर गव्हरनरजनरल साहेबाचे मंत्री अथवा जोडीदार.

ग्रेजानीं घेतलेले आढेवेढे हा प्रकार ज्या पत्रांत आहे तीं पत्रें येथें दाखल करतों. त्यांत ' नानांचा इंग्रजाविषयीं अभिप्राय ' ही दिसून येईल.

---

१

राजश्री तारोपंत स्वामींचे शेवेसी.

विनंती उपरी राजश्री पाटील बावांची पत्रें येतात कीं, ' इंद्रसेन निरोपाची जलदी करतो. पुण्याहून पत्रे येतात त्यांत निश्चय ठरून लिहित नाहींत. ' ह्मणोन वारंवार लिहितात. त्यास वुड्यांकडे इंग्रजाचा तह करण्याचे कलम बंदीनें पत्र पूर्वीं पाठविलें. व निदानपक्ष लिहिलाच आहे. त्यास मुख्य सरकारचा मुद्दा श्रीमंत राजश्री दादासाहेब व साष्टी. त्यास साष्टी तर होत नाहीं. त्यास दादासाहेब कुटुंबासुद्धा इंग्रजानीं हवालीं करावे. त्याप्रमाणें तहनाम्यांत ठराऊन व वरकड कलमापैकीं जेथवर होईल तेथवर करारांत आणून आधीं दादा आल्यावर मग ठाणीं मुलख घेणें तो व्हावा. असें जाहलें तरच तह करावा. दादांचें कलम मळमळीत लिहिलें आहे. तसें असल्यास तह करणें ठीक नाहीं. चहुंकडील दोष मसलतीस येऊन ( थोडें फाटलें आहे. ) सरकारांत गाडराकडून उदीष्टीन आला त्याचे बोलण्यांत दादा व साष्टी हीं द्यावयाचें होतें. परंतु राजश्री पाटीलबावांकडे कलकत्याहून इंद्रसेन आला. तेंही राजकारण सरकारांतच आहे असें जाणोन व नबाब भोसलेही इंग्रजांचे तहाविशीं बोलत होते तें न ऐकून उदिष्टिनास निरोप दिला. आणि हल्लीं दादा हवालीं करूनं घेतल्या खेरीज तह केला असतां आपले सरकारचे मसलतीस ही कांहीं न जाहले. आणि नबाब व भोसले हे काय ह्मणतील ? हैदरखानाच मुद्दा कांहींच न झाला. तेव्हां खान तो फारच वाईट मानतील हे अर्थ पुरते ध्यानांत आणावे. दुसरें साष्टीचा मुद्दा होत नाहीं व अंतरवेद वगैरे ही कलमांत नुकसान्या व हैदरखान षरीक जाहाला त्याचे कांहींच नाहीं. त्यास करार असतां तोडावे व फराशीसही त्याचें राजकारण तोडावें इतक्या गोष्टी कबूल करून दादांचे ही कलम मळमळीत जाहीराणा मात्र तहाचा होऊन हैदरखान उगाच सोबती आहे तो नाहींसा होईल आणि आपले घरचें खूळ दादा येणार नाहीं बाहाणे हजार लावतील बिनसल्यास मसलत ही उभी फिरोन राहिल. या करितांदादासाहेबांस इंग्रजकुटुंबासुद्धां निखालास हवालीं करीत असेल तर तह

करावा. नाहीं तर करणें ठीक नाहीं. याप्रमाणें सांगावें तुह्मांकडील पत्रें आलीं त्यांची उत्तरें मागाहून सविस्तर लिहून पाठऊं तुह्मांस हा मजकूर जलदीनें कळावयाकरतां हें पत्र पुढें पाठविलें आहे. शा छ १७ जिल्हे ज हे विनंती.

———

२

राजश्री नारोपंत स्वामीचे शेवसीं.

विनंती उपरी राजश्री पाटील बावानीं दोन तीन पत्रें आह्मांस लिहिलीं त्यांत श्रीमंत राजश्री दादासाहेबांस इंग्रजांनीं स्वाधीन करावें असें पक्कें करारांत आणिलें आहे. हें पक्कें करून घेऊं तरच तहनामा देऊं नाहीं तर देणार नाहीं. व तुम्हां कडूनही त्याच अन्वयें पाटिल बावांनीं लिहिविलें. आणि ' तहनामा पारशी नक्कल पाठविली. त्याप्रमाणें शिक्का करून पाठवावा. व डौल पाठवावे शिक्याचा तहनामा इंद्रसेनास दाखविल्यावर त्यास भरंवसा पुरेल. मग निदानचीं कलमें लिहून पाठविलीं त्यापैकीं करारांत आणिलीं त्याचा तपशील लिहिल्या प्रमाणें डौलांत भरून त्याचा तहनामा कलकत्त्याहून आणऊन मग हा देऊं ' याप्रमाणें पत्रें तीन रवानग्यांचीं आलीं त्यावरून पारषी नकले प्रमाणें तहनामा शिक्यानशीं व डौलाशिक्का करून पाठविलीं आहेत. परंतु सरकार रीती प्रमाणें तहनामा नाहीं असो हा ठेवावयाचाच आहे. मग चिंता नाहीं. इंद्रसेनास दाखवावया करतां आणाविला ह्मणून पाठविला आहे. डौलांत भरणें ते पुढें यथापद्धत करावयास येईल परंतु श्रीमंत राजश्री दादा साहेबास आगोदर स्वाधीन करून मग किल्ले मुलुख घ्यावे. असें ठरलें तर तहकरावयाचा नाहीं त्यापक्षीं करूं नये. जर इंग्रजाचे मनांत दादासाहेबांस स्वाधीन करणें हें निखालस आहे. त्यापक्षीं आगोदर स्वाधीन करण्यास काय बाध ? जर पुढें इंग्रजाचें मनांत दादासाहेबांस ठेऊन लबाडी करणें नाहीं तर आगोदर देतील. जर लबाडी करणें आहे तर आगोदर देणार नाहींत हीच परिक्षा तहाची आहे. मग उगीच आगोदर किल्ले ठाणीं घेऊन चोंहीकडून मनसब्यास विलगपाडून घ्यावें हें ठीकनाहीं जर दादासाहेब आगोदर न येता तह करूं लागले तर तहनामा पाठविला हा रद्द ह्मणोन सांगावें. शा छ १५ मोहरम हे विनंति. '

———

३

' राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंति उपरी राजश्री पाटील बावांचे पत्रांत लिहिलें आहे कीं, आधीं सरकारचे किल्ले व ठाणीं व मुलूख सोडावा. उपरांतीय दादा-साहेबास स्वाधीन करावें, असें इंद्रसेनाशीं करारांत आहे. त्याप्रमाणें इंग्रजांनीं सरकारचा मुलूख व जागा सोडल्यावर दादासाहेबांस कशास ठेवितील ? व तुमचे पत्रांत ' इंग्रज ह्मणतात कीं ' दादासाहेबांस स्पष्ट तुमच्या स्वाधीन करावें यांत आमचा लौकीक राहत नाहीं. तुमचा आमचा तह जाला ह्मणजे तुम्ही आपल्याकडील कोणी मातबर माणूस दादासाहेबाकडे समजुतीस पाठवावें. ह्मणजे आम्ही त्यास निक्षून सांगोन तुमचे स्वाधीन होत असें करूं. यावरून पाटील बावांशीं बोलिलोकीं विना दादासाहेब हातीं आल्याखेरीज तह घडावयाचा नाहीं. त्यावरून पाटील बावा बोलिले आहेत कीं सरकारचा तहनामा आल्या उपरांतीक हे बोलणें इंद्रसेनाशीं बोलून जर दादासाहेब हातीं आले तर तहनामा देऊं नाहीं तर देणार नाहीं ह्मणोन लिहिलें त्यास आधीं सरकारचे किल्ले व ठाणीं व मुलुख सोडल्यावर दादासाहेबांस कशास ठेवितिल ! असें पाटीलबोवाचे लिहिण्यांत व कोणी गृहस्थ दादासाहेबांकडे पाठवावा. आह्मी ही त्यास निक्षून सांगोन तुमचे स्वाधीन होत असें करूं असें इंद्रसेन ह्मणतो. त्यांत तहाचीं कलमें ठरावांत आणावीं, तेव्हां ठराव तर झाला ; मग आ-गोदर सरकारचे किल्ले ठाणीं व मुलुख घेऊन मग दादासाहेबांकडे गृहस्थ पाठवून इंग्रज निक्षून त्यास सांगोन स्वाधीन होत असें करणार ; ते तह ठरल्यावर, काय दादास सांगणें तें सांगोन हस्तगत होत तें आधीं कां करीनात ? दादासाहेब स्वाधीन होत असें करूं म्हणतात. मग आगोदर असें केल्यास कायबाध ? मग किल्ले मुलूख घ्यावा. इंग्रजास करणें त्यापक्षीं फळ मारखेच आणि असें न केलें तर मुलुख घेतल्यावर दादास हजार बाहाणें लावतील. शेवटीं दुसरीच तऱ्हा पाडतील. मग इकडे हैदरखान व-गैरे ही काय करतात कळत नाहीं. आणि दादासाहेबांचें न येणें. मग तह करून ही फळ नाहीं. याकरतां आगोदर दादासाहेबांस काय सांगणें त्या तऱ्हेनें सांगून स्वाधीन होत असें करा. तो पावेतों किल्ले मुलुख आहे तसा असूं द्यावा. दादासाहेब आले म्हणजे मुलूख किल्लेही

घेऊं. असें बोलावें किल्ले मुलुख आगोदर घ्यावे असें इंद्रसेन ह्मणतो. त्यास करारांत ठरलें, तेव्हां घेतल्या दाखलच ठरलें पुढें महिन्या दोहोंमहिन्यांत दादासाहेब येतसे किल्ले मुलूख घेतल्यावर करणार ; तें करून दादासाहेब यावे. मग किल्ले मुलूख द्यावा. यांत कांहीं तह व बोलणीं लिहिणी ठरलीं. यांत उणें होत नाहीं. असें असतां किल्ले मुलूख घेतल्यावरच दादासाहेब स्वाधीन होतील असेच ह्मणूं लागला तर परिछिन्न तह स्वच्छतेनें करीत नाहीं. असें समजावें. आगोदर स्वाधीन केल्यास निखालस तह असें समजावें. सरकारचा मुलूख किल्ले आगोदर आल्यास किफायतच आहे. आल्यास चांगलें. मग दादासाहेब आले तर कायचिंता ! असें आह्मी ह्मणावें. परंतु पुढे पेंच आहे याकरितां ते आह्मीच दोन महिने तुह्मांकडे आहे तसा असोंद्या ह्मणतो यांत नुकसानी आहे कीं नाहीं ? परंतु नुकसानी कबूल करून पुढें दोन महिन्यांनां युक्तीनें स्वाधीन करणार ते दोन महिने टाणीं मुलूख त्याकडेच असल्यानें दादासाहेब स्वाधीन झाले ह्मणजे द्यावा. सारांश दादासाहेब स्वाधीन झाल्याखेरीज किल्ले मुलूख घेऊं नये. लिहिली तोड ही चांगली. या प्रमाणें झाल्यास करावें. पुढें तरी दादासाहेबांस इंग्रज स्वाधीन करण्याचे करारांत आलेंच आहे. तों पावेतों किल्ले मुलूख त्यांकडेच असावा. ही तोड चांगली आहे. शा। छ १९ मोहरम हे विनंती.

४

( एका पत्रांतील या विषया पुरता उतारा खालीं घेतला आहे. )

‘ श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस पाटील बावांचे स्वाधीन करूं असें कलम बंदींत लिहिलें नाहीं. परंतु इंद्रसेनाच्या बोलण्यांत करार आहे कीं ‘ कलमबंदीचे यादींत दादासाहेबांचें कलम लिहिलें आहे. त्या मुदतीस युक्तीचे वाटेनें तुमचे स्वाधीन करूं ’ ह्मणोन लिहिलें त्यास इंग्रजाच्या या बोलण्यावर जाऊं नये. ते दगाबाज आहेत. या करितां दादासाहेबांस आगोदर आपले हातीं घ्यावे. अथवा कचेश्वरास आणून पाचवून द्यावे येविशींचा मजकूर पेशजीं लिहिला आहे. व हल्लींही कलमबंदीच्या उत्तरांत आलाहिदा लिहिला आहे त्याप्रमाणें वडावा. ’

———

९

' राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंति उपरी राजश्री पाटील बावांचे व इंद्रसेनाचें बोलणें तह प्रकर्णीं होऊन ठराव झाला. त्यांतील सारांश प्रथम पांडुरंगपंतांनीं लिहिला. त्यावर रामजीपाटील यांकडे याद आली. त्यांची कलमांत गुणदोष येतात ते भाव लिहून उत्तरें पेशर्जीच गलींत. उपरांत पाटील-बावांनींच तह प्रकर्णीं दोन यादी हिंदवी व पारशी पाठविल्या. त्यांचींही उत्तरें पेशर्जीच पाठविलीं. व हल्लींही निदान पक्षाचीं कलमें शेवटील तोडजोडीचीं लिहून पत्रें पाठविलीं आहेत. याप्रमाणें तर घडावेंच घडावें. या उपरी येथें लिहून पाठवून उत्तर जावयास दिवसगत लागत्ये. इंग्रजाची मसलत शेवटास जाऊन पुढील मसलतीचे डौल धरावयाचे धोरवट एव्हां पासून घडलें पाहिजे. या करतां लिहिल्या तोडजोडी प्रमाणें घडविलें असतां चांगलें. व पाटीलबावा मातबर सरदार त्यांणीं सरकारचा तह इंग्रजांशीं पक्का केला हाही त्यांचा नक्षा मोठा होतो. सर्व भाव हे पाटीलबावांचे ध्यानांत यावयाजोगे आहेत. सारांश इंग्रजाचा तह पक्का करावा. तह झाला असतां हैदरखान यास वाईट वाटून वांकडी चाल धरल्यास त्याचेही पारिपत्यास इंग्रजानी परीक असावें हें आधीं शपत पुरःसर पक्कें करून घ्यावें. सदरहू लिहिल्या तोडजोडी इंग्रजासही भारी पडावयाजोग्या नाहींत. त्यांणीही कबूल कराव्या. व पाटीलबावांनीं इंग्रजाकडून कबूल करवाव्या. तुह्मी पाटीलबावांकडे जाणार, ते पाहोंचलाच असाल. नसलेत तरी पत्र दर्शनीं लांब लांब मजली करून, दोन तीन पर्याय लिहिले आहेत, हे सविस्तर एकांती चांगले रीतीनें बोलून करावें. रामजीपाटील व सदाशिवपंत यांची रवानगी करतों ह्मणून पूर्वीं पत्रें पाठविलीं होतीं. परंत त्यांस तेथें पोहों-चावयास दसरा येईल. तदनंतर उत्तर प्रत्युत्तर येण्यास व जाण्यास दिवसगत लागत्ये. मसलतीचे धोरवट पुढील बांधणें यास दिवस राहत नाहींत. या कारितां सर्व अर्थ खोलून लिहिले आहेत. तहाचा ठराव होतांच आगोदर दादासाहेबांस कुटुंब सुद्धां इंग्रजांनीं आणून द्यावे. मग किल्ले कोट मुलूख यांच्या चिठ्याच्याव्या. नाहीं तर आगोदर किल्याकोटाच्या सनदा घेऊं नयेत. घेतल्यानें किल्ले

कोट शहरे मुलूख सरकारांत देतील. जाहीराणा शौहरत सलुखाची झाली मग दादासाहेबांविशीं बाहाणे लाविंतील. नानाप्रकार करतील इकडे हैदर-खान सुखे राहणार नाहींत मग पेंच पडेल. हें पुरतें ध्यानांत आणून ठेवावें. मग ठाण्याच्या चिठ्या द्याव्या. ईफटेनचे तह समई इंग्रजांनीं दादासाहेबाचा करार केला. आगोदर ठाणीं मुलूख द्यावा. मग दादाही कराराप्रमाणें येतील त्यावरून मुलूख व ठाणीं घेतलीं. मग दादांचे येण्यास नानाप्रकारच्या दिकती लाविल्या कीं, मुंबईकर लबाडी करतात. मुंबईकर म्हणत कीं कलकत्तेकर करतात. असें करून दादास ठेऊन घेऊन पुढें तळेगांवची मसलत केली. याकरतां लिहिलें आहे. दादासाहेब कुटुंबसुद्धां आले. व ठाणीं किल्ले आल्यावर मग इंद्रसेनाचे येणें श्रीमंता पाशीं घडावें येणें करून चांगलें. पूर्वीं राजश्री पाटीलबावाचेही लिहिण्यांत होतें कीं इंद्रसेनास पुण्यास पाठवावयाचे असल्यास पाठऊं. तो आल्यानें जाहिराण्यास चांगलें. लिहिल्याप्रमाणें तुम्ही बोलून करावें. याउपर तहप्रकर्णीं लिहिण्याचा अर्थ कांहीं राहिला नाहीं. सर्व भार पाटीलबावावर ठेविला आहे. त्यांचे थारपणास येऊन जेथवर कलमें साधतील ते साधून ज्यांत चांगलें तें करावें. करतील. तुह्मी लिहिल्या अन्वये सर्वही अर्थ एकांती चांगलेरीतिनें बोलावे. शा छ १२ रमजान हे विनंती.

इंग्रेजांचे मतलबीपणा बद्दल ज्यांत पूर्णपणें उल्लेख आहे, असा नानांचा पुढील लेख पहा.

---

' राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंती उपरी हैदरखानास मसुद्या प्रमाणें पत्र राजश्री पाटीलबावांचें पाठविलें तें पावलें, ह्मणून पूर्वी तुह्मांस लिहिलेंच होतें हैदरखानानें सरकारच्या वकिलास निरोप देऊन बेंगरुळास गेले. निभावणी पत्रही त्यांकडे रवाना केलें. सरकारच्या वकिला बरोबर त्यांनींही आपले कडील तहनामा व मध्यस्तांस खातरजमेचीं पत्रें देऊन बराबर नरसिंगराव वकील यांसही देऊन रवानगी केली. सरकारच्या वकिलापासून हैदरखानानें निघते समयीं खातरजमा करून घेतली कीं, पाटीलबावांचें निभावणीपत्र लौकर पाठऊन द्यावें. त्यास निभावणी पत्रही इकडून गेलें. चांगलेंच जालें. बागलकोटानजीक वकील

---

×आपटन साहेबाबरोबर पुरंदर मुक्कामीं ठरलेला तह.

आल्याचीं पत्रें आलीं. येथें पोंचल्यावर लिहून पाठऊं आलिकडे हैदरखानांचीं पत्रें त्यांचे वकिलास आलीं. त्यांत, बेंगरुळाहूनही कुचकरून हैदरखान, कडपनाथाचे घाटानें आर्काटावर गेले. व मिराबरावर फौज देऊन *चेनापट्टनचे तालुक्यांत हंगामा पूर्वींच सुरूकरविला. चेनापट्टणची बातमी आली त्यांत लिहिलें आहे कीं, हैदरखान बिघाड करून येत आहे. यामुळें महंमदअल्लीखान व चेनापट्टणकर इंग्रज बहुत घाबरे होऊन लढाईची[1] तरतुद करतात. वकिलानें कुपियों[2] बातमींत सुचना लिहिली आहे कीं, इंग्रज व महंमद अल्लीखान मनसबा करतात कीं, 'पंत प्रधान यां कडे अनुसंधान लावावें. आणि हैदरखान यास[3] सांगावें कीं, तुम्ही पंत प्रधान यांचा काय भरंवसा धरलात ? आह्मांस म्हणतात कीं तुम्ही आह्मी मिळोन हैदरखानाचें पारिपत्य करूं. त्यांस, आम्ही पंतप्रधान यांचा स्नेह चाहत नाहीं. जर तुम्ही नच ऐका. तर आम्हीं याप्रमाणें करतों आणि तुम्ही आम्हांस अनुकुल झाले तर, पंतप्रधान यांची दौलत तुह्मी आम्ही मिळोन घेऊं. असा शकटभेद, हैदरखानाचें व सरकारचे द्वैत पडावें याकरितां करणार आहेत. सावधता असावी हैदरखानानें सरकाराशीं स्नेह संपादून इंग्रजाशीं बिघाड केला. हा येसमयीं मोठा उपयोगी आहे. इंग्रजाचें मानस आहे कीं, हैदरखान, श्रीमंत, व नबाब, या तिघांच्याही दौलता घ्याव्या. त्यास कोणेही प्रकारें, एकेकांशी शटक भेद करून, एकास खालीं पाडावें, असें करतां एक राहील. त्यास आपण शेवटीं गुंडाळावें. याची पूर्ती बंदोबस्ती असावी ' म्हणून वकिलानें लिहिलें आहे. हें वर्तमान पाटीलबावांस सांगावें. येथीत तो मजबुदी पाटीलबावांचे भरंवशावर पक्कीच आहे. पूर्वी पत्राच्या रवानग्या तीन चार जाल्या त्याचीं उत्तरें अद्याप आलीं नाहीं हें काय? आतां वाटेचाही पेंच नाहीं याकरितां पत्रें वरचेवर येत जावीं रा।। छ० २ माबान हे विनंती.

( पा।। छ० १२ साबान सुा इहीदे समानीन मुक्काम उजेन )

( इ० स० १७८० )

इंग्रजांचे संबंधानें नाना किती सावधपणा ठेवीत तें पहा —

---

* मद्रास. १ लढाईची धामधूम. २ गुप्त. मूळशब्द खुफिया. ३ हैदरखानास.

' राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसीं. )

विनंती उपरी ' इंग्रजाचा कंपू सुरतेकडे आहे त्याचें प्रयोजन असलि-यास ठेऊन घ्यावा ' म्हणोन तुम्ही लिहिलें होतें, त्याचें उत्तर इकडून पाठविलें होतें तें पावलें असेल. हल्लीं सुरतकराचें पत्र आम्हांस आलें त्याची नक्कल पाठविली आहे. त्यावरून मजकूर कळेल. इंग्रजी जमाव ब-हाणपुरावरून, माळव्यांतून जाईल, त्यास दस्तक द्यावें ' असें लिहिलें आहे त्यास इंग्रजानीं ब-हाणपुरचा रस्ता पाहणें व खुष्कींतून जाणें चां-गलें नव्हे. कोठें करारांत ही गोष्ट नाहीं. तेथून सुरतकरास पाटील बावांनीं कसें पत्र दिल्हें? तुम्ही येविशीं पाटीलबावांशीं बोलोन इंग्रजांचा जमाव दर्यांतून जावा असें करावें. करारांत नाहीं, व पुढें मागें ही चाल फार वाईट. यास्तव इंद्रसेनाशीं पाटीलबावानीं बोलोन दर्यांतून जावयाचें करावें. रा। छ २२ जमादिलावल हे विनंती. '

इंग्रजांचें मतलबी भाषण पाटीलबावांस कळत नसे. परंतु नानांस त्यांतील मतलब तेव्हांच दिसून येई. पुढील पत्र पहा.—

---

' राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसी.

विनंती उपरी ' टिपुवर सरकार व इंग्रज मिळोन मसलत करावी आ-णि इंग्रजाचा मुलूख सोडवावा. व सरकारचा सोडवावा. नवा सुटेल त्यापैकीं निमे इंग्रजानीं, निमे सरकार याप्रमाणें घ्यावा. नबाबांस देणें तो सरकार पैकीं द्यावा. इंग्रजाचें दुसरें बोलणें नाहीं. असें पाटीलबोवा बोलले. म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास नवा मुलूख सुटेल त्याची फौजेवर वाटणी करून घ्यावा. असें पूर्वीं लिहिलें होतें त्याचें उत्तर असें जालें म्ह-णोन लिहिलें त्यास सरकारच्या निमे वाटणी पैकीं नबाबास निमे वाटणी दिली असतां, सरकारांत काय राहतें? इंग्रजाकडे निमे मुलूख जातो. सरकारांत चौथाईची वाटणी येते. असें होतें याजकरितां पेशजी लिहिलें आहे त्याप्रमाणें फौजेवर मुलखाची वाटणी करून घ्यावी. याप्रमाणें इंद्रसे-नाशीं बोलून करारांत आणावें. म्हणजे चांगलें. याप्रमाणें तुम्ही पाटील बावांशीं बोलावें. पूर्वीं फौजेवर वाटणी, असें लिहिलें असतां हल्लीं लिहि-ण्यांत काय आलें? येणें करून मसलतीचें धोरवट कसें समजावें? रा। छ ४ जिलकाद हे विनंती.

# भाग २.

## महादजी शिंद्याचे विरोधात्मकलेखावर नानांचीं योग्य उत्तरें.

( केव्हां सत्यवदे वदे अनृतहां केव्हांवदे गोडही.
केव्हां अप्रियही दयाळूही असे केव्हां करी घातही
जोडी अर्थ हि जें यथेष्ट समयीं कीं रेंचही आदरी
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी.

वामन—नीति शतक. )

महाराष्ट्रदेशाच्या किंबहुना सर्व हिंदुस्थानाच्या दुर्दैवानें नाना व पाटील बावा या उभयतांमध्यें विरोध उत्पन्न झाला. ' एका हातानें टाळी वाजत नाहीं ' या प्रसिद्ध म्हणीप्रमाणें हें द्वैत उत्पन्न होण्यास दोघांकडूनही जरी कारणें झालीं असतील तरी आह्मी जें वाचिलें आहे व ऐकिलें आहे, त्यावरून या कामीं दोषाचा पुष्कळ भाग पाटीलबावांकडेच होता, असें आम्हास वाटतें. या द्वैताचें मूळ महादजीचा अतोनात द्रव्यलोभ होय. या लोभास्तव नाना जो कारभार करितात, तो आपणाकडे असावा अशी पाटीलबावांस उत्कट इच्छा प्राप्त झाली होती. व त्यामुळें त्यानें आपले मर्यादेचें अतिक्रमण केलें. महादजी जोंपर्यंत योग्य मर्यादेनें चालत होता, तोंपर्यंत नानांना त्याजविषयीं कधींही वांकडेपणा मनांत आणिला नाहीं. व आणण्याचें कारणही नव्हतें. नाना आपण होऊन या द्वैतास प्रवृत्त झाले नाहींत, असें मानण्यास आह्मापाशीं पुष्कळ आधार आहेत. स्वराज्याचा उत्कर्ष व्हावा अशी नानांची प्रबळ इच्छा होती, संपूर्ण शत्रूंचें दमन करण्यास शक्तिमान असा एक महादजीच आहे अशी नानांची पक्की खात्री होती, आपसांत द्वैत उत्पन्न झाल्यानें सर्वस्व नाश होतो हें तत्व नानांचे मनांत पूर्ण ठसलेलें होतें, इंग्रज व फ्रेंच हे एतद्देशीय राज्यांचा स्वाहाकार करण्यास टपून बसले आहेत हें नाना जाणून होते, हैदरअल्ली कोणते वेळीं घाला घालील याचा नेम नाहीं ही नानांस नेहमीं काळजी

होती; मग एवढ्या गोष्टी असतां नाना आपण होऊन महादजीशीं विरोध करितील हें अगदीं असंभवनीय आहे. महाराष्ट्र राज्यरूप इमारतीचा महादजी हा मुख्य स्तंभ आहे, सर्व दौलतीची भिस्त महादजीवर आहे, असें जाणून तदनुरूप महादजीशीं नाना वर्तन ठेवीत होते; कधीं उपदेशपर, कधीं टोचून, कधीं मोठेपणा देऊन व सर्वदां गोडभाषेंत नाना महादजीस लिहीत. व त्याच्या अक्षेपांचे योग्य खंडन करीत.

एवढा प्रस्ताव करून, पाटीलबावांचे आक्षेप व त्यांजवरील नानांचीं मधुर उत्तरें देण्यास आह्मी आरंभ करितों.

महादजीनें आपले आक्षेप नानाकडील वकिलांस कळविले, व त्यांनी ते नानांस लिहून पाठविले; आणि नानांनीं वकिलांस पत्रें लिहून त्यांत त्यांचें खंडन केलें आहे. या पत्रांत प्रथम महादजीचें सर्व ह्मणणें उतरून घेऊन मग त्यांतील निरनिराळ्या अक्षेपांवर यथानुक्रमें उत्तरें दिलीं आहेत.

---

१

' राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंती उपरी. ' * आमची विक्रांति[1] कारभाऱ्यांस[2] आली. ह्मणोन जांबगांवींच आमचें पारिपत्य करीत होतें, तो डाव चुकला. परंतु डंश चित्तांतील कसा जातो ? या करतां आम्हांस इर्ष्या[3] देऊन लिहितात. आंतून इंग्रज, व गायकवाड, मिळऊन घेतलेच आहेत एक होऊन तोफखान्यानें इंग्रज सडकील, फौजेनें गायकवाड दमवील, परंतु ज्याचे निष्ठेत भंग नाहीं, तो आपश पावणार नाहीं. चिंतो विठ्ठल वगैरे यांणीं छापे आणविले, दंगे केले, दंग्यांत आमचेच घोडे माणूस जखमी व मरत गेले. इतर कोणाचे नाहीं. होळकरांकडील पेंढाऱ्यांनीं चार दिवस मेहनत केली. शेवटीं त्यांसही मना केलें. याप्रमाणें संगत असोन, आह्मी तो भ्याडैच. इंग्रज चालून आला तेव्हां ( फजीत )

---

* येथपासून अवतरण पुरें होईपर्यंतचा मजकूर वकिलाचें पत्रांतील आहे. व हें महादजीचें ह्मणणें वकील कळवीत आहे. १ विवाद २ हें त्रालणें नानांस उद्देशून आहे. ३ इर्षा ४भित्रे.

पावला. गायकवाडांचें राजकारण इंग्रज कुच करून गेल्यावर इकडे येतो ' असें होतें. परंतु अमलांत आलें नाहीं. फिरून मूत्र लाविलें कीं, ' इंग्रज सुरतेस पावते करितों. तुह्मी आडवे न यावें. व बशर्ती यादींतील काढावी ' त्याची उत्तरें केसोपंतांनीं केलियाचा, व सहा घट- का रात्रीस केसोपंतास गोटाबाहेर करून दिल्ह्याचा, दिवसा ठेविल्यास पुण्याहून गोपाळराव रामचंद्र निसबत गायकवाड, व गोविंदराव देशमुख चांभारगोंदेकर निसबत माधवराव राई व हरिपंतांकडील कारकून, असे चौघे कारकून व दोन हुजरे, सरकारचे, फत्तेशिंगाकडे राजकारणास आले आहेत. त्यांची गांठ पडेल ह्मणोन केसोपंतास पांहाटचे रात्रीसच काढून दिला. पुण्याहून पत्रें तुम्हांस येतात कीं, ' राजकारणाचा येकत्यार पाटीलबावांचा ' मग सरकारांतून कारकून हुजरे कां पाठवावें ? ' राजकारण करून पहावें ' ह्मणून पाठविले तर, त्यांणीं आह्मांशीं भेटून गायकवाड भेटावयास जावें, तें कांहींच नाहीं. किती दिवस त्याचे लष्क- रांत आले भेटले. आह्मास चिठ्ठी देखील नाहीं. सुरतेस गेले दादासाहेब दाहारोज तेथें राहून, बायकांशीं, दादाशीं, राजकारण करून आले. सुरतेंत गणेशपंतानीं कसे जाऊं दिले ? व येथून इकडे कसे येऊं दिले ?' हें आह्मांस ठीक दिसत नाहीं. धनीपणा कारभाऱ्यांकडे आहे. आमचे पारपत्याचे मनांत आहे. ह्मणून अशीं कारस्थानें चाललीं आहेत. इंग्रज नर्मदेचे उत्तर तीरीं असतां मोहीम आमचे गळां आहेच. रेवा पारदक्षण तीरीं जाऊन सुरतेस छावणी करील. इकडे कारभाऱ्यां- नीं सांभाळून घ्यावा. आम्ही चाकरी धन्याची जाणतो. त्याशीं बेमानी करणें नाहीं. थोर जाहल्यास बलावितील तेव्हां जाऊं तों पावतो रेवा उ-

१ हा शिंद्याच्या पक्षाचा गृहस्थ त्या वेळीं सुरतेस होता असें दिसतें. २ हे चार इसम नानांनीं परभारें दादांकडे बोलणें करण्यास पाठविले असें शिंद्याचें ह्मणणें होतें. ३ गायकवाड. ४ नानांचे वकिलाजवळ हें महादजी बोलत आहे. ५ आनंदी बाईशीं. ६ इंग्रज. ७ येथें ' तिकडे ' हा शब्द पाहिजे होता. नर्मदेचे उत्तरेस मात्र आपण इंग्रजांशीं लढूं. दक्षिणेस इंग्रज येईल, त्याशीं सामना करण्याची तजवीज नानांनीं करावी, असा महा- दजीचा आग्रह होता. व नानांचें म्हणणें कोठेंही इंग्रज असला तरी त्याशीं महाराजांनीच लढावें असें होतें. ८ हें बोलणें श्री० सवाई माधवराव यांस अनुलक्षून आहे.

तरणार नाहीं. कारभाऱ्यांसही ममता करून चालविणें तर दुरून चा-करी सांगावी. यांतच निखालसता समजेल. अगदींच आह्मी नसावें असें असल्यास, आणखी छायेस पोट मरूं. परंतु या उपरी रेवापार जाणार नाहीं. *याप्रमाणें लिहावयास आज्ञा केली त्यावरून लिहिलें असे' ह्मणोन विस्तारें लिहिलेलें कळलें. +त्यास कारभारी असतील त्यांस विकृति येईल. आम्ही कांहीं कारभारी नाहीं. श्रीमंतांचे शेवक. चाकरी करावी. इतकें जाणतों. सुचेल तें लिहावें, बोलावें, करावें, इतकें जागतों. व जेथवर आपले वस्तू शेवा होईल तितकी करावी. सर्व भार पाटीलबावांवर असतां अशीं बोलणीं बोलून तुह्मांकडून लिहिवावीं, याचें कारण कांहीं दिसत नाहीं. जे दौलतीचे स्तंभ व ज्यांजवर दौलतीची मदार आणि आमचा अकृत्रीम भाऊपणा असतां ' जांनगांवीच आमचें पारपत्य करीत होते ' हें बोलणें कसें निघालें ईश्वर जाणे ! ' तो डाव चुकला म्हणोन इंग्रज गायकवाड यांस, मेळऊन पारपत्य करावें ' हे तो त्याहून विशेष कल्पना चालली याचें उत्तरच नाहीं. यांत एक खरें कीं निश्चित अंतर नाहीं. येणें करून, इंग्रज गायकवाड फजीतच पावत गेले. व ज्यांणीं ल-वाड्या केल्या, तेही फळ पावले. हें यथार्थ. पाटीलबावांची निष्ठा तशीच आहे. ईश्वर दिवसेंदिवस अधीकच यश देईल. हीच इच्छा आमची आहे. ' सूत्रें अनुसंधानें सोवत्यांनीं वगैरे खेळविलीं, छावे आणविले. ' म्हणोन लिहिलें. त्यास जो एकनिष्ठ काळजी धरून खा-वंदाचें काम करतो त्यापुढें कोणाचें चालत नाहीं. व पाटीलबावा मेहनत करून लढाई करतात. म्हणूनच ' दरझुंजास माणूस घोडें मरत गेलें . ' जो तमाशा पाहणार त्याचें कशाला मरेल ' ! ही उघडीच गोष्ट आहे. ' पेंढाऱ्यांस मना करविलें ' हें तर अपूर्व वाटलें ! असो. जे असें करतील ते फळें ही पावतील. ज्यांनीं बहुत लढाया मोठ्यामोठ्या मारल्या त्यांस ' म्या-ड ' ह्मणत असतील ते बुद्धीमान ह्मणावे. गायकवाडाचा मनकूर विस्तारें पूर्वी लिहिलाच आहे. पुण्याहून गोपाळराव रामचंद्र पाठविले. येविष-

---

१ दुसऱ्याकडेस नोकरीस जाऊं. *हें वकिलाचें बोलणें २ येथें वकिलाचे पत्रांतील मजकूर पुरा झाला. + येथपासून नानांचे उत्तरांस सुरवात झाली. वाचकांनीं एकवार दृष्टि मागें फिरवून महादजीचे सारे आक्षेप लक्षांत आणावे. ह्मणजे त्यांस दिसून येईल कीं नानांचीं उत्तरें यथानुक्रमें दिलीं आहेत. इकडून.

थीं पूर्वी लिहिलेंच होतें. हल्लीं तुमच्या लिहिण्यांत ' गोविंदराव व हरिपंताकडील कारकून व विसाजीकृष्णाकडील मल्हारपंत असे चौघे, सुरतेस येऊन, दादाशीं, बायकांशीं, राजकारण करून गायकवाडाकडे आले. त्यांची केसोपंताशीं, गांठ पडेल ह्मणोन केसोपंतास रात्रींसच काढून दिल्हा असे लिहिलें तेव्हां याजवरून, व मागील गोष्टीवरूनही, बातम्या यथार्थ कळतात. व सांगणार सांगतात. त्यांत केसोपंत गेले तेव्हां वर्तमान खरेंच असेल ! तुमचें पत्र येतांच माधवरायाकडील *गोविंदराव, चांभारगोंद्यांस बायकोस बरें वाटत नाहीं, ह्मणोन तेथें फार दिवस आहेत. त्यांस बलाऊं पाठविलें आहे. व मल्हारपंत विसाजीपंताकडील येथेंच आहे.दोघांस, पाटीलबावाकडील गोविंदपंत येथें आहेत त्यांस +भेटविले. हरिपंताकडील कारकुनाचें नांवच लिहिलें नाहीं एरवीं तोही भेटविला असतां गोंदबानें रात्रीस केसोपंतास काढून दिल्हे, तें तें इंग्रजाच्या भया करतां असेल. त्याचा ग्रंथ विपरीत लावून चांगला बनावला. तेव्हां मुळींच चौघे कारकून गेले नाहींत. मग दादा, बायका, गायकवाड, याकडे राजकारणें खरींच झालीं असतील ! ! तेव्हां पाटीलबावास त्यांनीं भेटून जावें तें कां न गेलें हें ठीकच आहे. जेव्हां चौघे कारकूनं जाऊन राजकारण होतें आहे, तेव्हां तुम्हांस लिहिलें कीं, 'राजकारणा चा येकत्यार पाटीलबावांचा असें असतां याप्रमाणें केलें तेव्हां दोष खराच. हा दोष ज्यापक्षीं आहे, त्यापक्षीं इंग्रज सुरतेस आल्यावर, रेवा दक्षण तीरची मोहीम सहजच इकडे लागली. ज्यापक्षीं कारकूनच येथें पाटीलबावा कडील कारकुनास भेटवले. तेव्हां अवघ्याच गोष्टी एतद्विषयीं संदेहाच्या जाऊन, जिकडे इंग्रज राहील त्याचे छातीवर छावणी करणें प्राप्त. हें सिद्धच जाहलें. ही फार चांगली गोष्ट आहे. कारकूनच गेले नाहीं. त्यापक्षीं काय जाऊं देतात ? आणि जाणें कसें घडेल ? हें पाहावें. ' हुजूर चाकरी करूं. बेमानी होणार नाहीं. रेवा उतरणें नाहीं. ' हीं बोलणीं मात्र बोलावयाची मर्जी त्यांची असल्यास, त्यांनीं बोलावीं.

---

* जे गृहस्थ दादांशी राजकारण करण्यास परभारें पाठविलें असा महादजीचा आरोप आहे ते दादांकडे पाठविले नसुन कोठें कोठें आहेत त्याचा तपशील नाना लिहीत आहेत.

+ते ' राजकारण ' करण्यास गेले नाहींत अशी खात्री होण्याकरीतां.

परंतु + श्रीमंत लहान, सर्व भार पाटीलबावांवर, दौलतींत जीव काय आहे, संभाळावयास योग्य कोण आहे, हे सर्व अर्थ त्यांस समजतात. त्याप्रमाणें समजून करतात. मग आह्मी काय ल्याहावें. परंतु या गोष्टी बोलण्यांत देखील येऊं नयेत. व याचें कारणही नाहीं. ज्याच्या घराण्याचे एकनिष्टतेचे बाणे चालत आले त्याच्या चित्तांत 'दुसऱ्याचे छायेस पोटभरूं' हीं अक्षरेंच येणार नाहींत. ही खातर जमा आहे. इंग्रज, गायकवाड मिळून घेतले असते तर मुंबईकर इंग्रज बेलापुरास उतरून, बेलापुर व परसीम ( १ ) घेऊन पनवेलीस आले. त्याजवर राजश्री सखारामपंत पानशे, व बाजीपंत जोशी, यांज बराबर तोफखाना, फौज, व गाडर्दी देऊन पाठविलें. हे घाटावर जातांच पनवेलीहून, तळोद्यास जाऊन मजबुदी केली. तों यांणीं जाऊन गांठ घातली. दुसरे दिवशीं हल्ला करून चार पांचशें माणूस ठार. त्याचे गोरे व फिरकीवाले मिळून मारले. तोफा चार, व गरनाल एक पाडाव आणली. कांहीं गोरे धरले. त्यांत एक सरदारही पाडाव आला. हें होतांच तिकडे त्यांणीं कल्याण घेतलें तेव्हां कल्याणावर जाऊन, वेढा देऊन, मारागिरी होत आहे. हा मोड जाहाला व तोफा आल्या यामुळें मुंबईकरास फार चांड येऊन, आंगेजनी करीत आहे. श्रीमंतांचे दैवें करून जखच पावतील. तेव्हां मिळवून घेतल्यावर असें कां व्हावें? सारांष इकडून दादाशीं, व बायका, व गायकवाड, यांकडे कोणी राजकारणास पाठविलें नाहीं. व पाटील बावांचें वांकडे व्हावें, हें चित्तांतही नाहीं. येकत्यार इंग्रजाच्या मसलतीचा पाटीलबावां वरच आहे. कोणेही प्रकारें मसलत चांगली शेवटास जावी. पाटील बावांस यश यावें. भाऊपणा दिवसें दिवस अधीक चालवावा. हीच इच्छा आहे. रा। छ० १९ जमादिलावल हे विनंती.'

---

'राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी 'कितक संदेहामुळें रेवा उतरणार नाहीं' असें ह्मणतात. त्यास, येथें रती मात्र वांकडा अर्थ नाहीं व पुढें घडावयाचा नाहीं हे संदेह राजश्री नारोपंत, व रामजी पाटील यांची गांठ पडल्यावर अवघे दूर होऊन संतोषच होईल. 'कारभाऱ्यांसही ममता करणें तर, दुरून

+ श्री० सवाईमाधवराव १ पाटीलबावांस.

चाकरी सांगावी. ' असें बोलतात. त्यास राजश्री पाटीलबावांस चाकरी सांगणे, ते श्रीमंतांनीं सांगावी. ते लहान तोंपर्यंत जेथें उणें पडेल तथें संभाळणें त्यांकडे आहे. तेव्हां कारभारी काय चाकरी सांगतात? ' रेवा उतरणार नाहीं ' ही गोष्ट चित्तांत देखील आणूं नये. सर्व भार त्यांवर. मसलत पडेल तिकडे संभाळणें त्यांकडेस आहे. रा छ १९ जमादिलावल हे विनंती.

---

' राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंती उपरी ' *पुण्याहून चौघ कारकून सुरतेस येऊन, दादा कडून, व बायका कडून, मनसबा काय करून आले असतील ते जाणत. मजकूर गोविंदबाशीं बोलुन गार्डराशीं बोलले. त्याणें उत्तर केलें जे 'दादासाहेबाचे पत्रावांचुन मजला कबूल नाहीं ' सबब गोविंदराव आणखी एक गृहस्थ पुनः सुरतेस दादांचे पत्र आणावयास गेले आहेत. मोहीम सांगितली आह्मांस दोष लाऊन चित्तास येईल तसें लिहितात. आधीं लिहिणें उचीत नाहीं तसाच दोष लावून पहावें इरेसें घालावें. साहित्य करावें. आमचे बगलेंत औघ आहे ती विझऊन, मेहनती विषयीं इरेस घालून, सरकार काम करून घ्यावें ही वाट आहे. तें त कारितां अमची पारपत्याचीच विवंचना होत आहे. नाहीं म्हणतील तर गोविंदबा स्पष्ट सरकारचे नाशास प्रवर्तक. हें लिहिलीं गेलीं असतां खरें वाटलें नाहीं. सांप्रत सिनोर, चांडोद, कर्नाली, व राजपिपळ्याचा हिस्सा, गोविंदबानें धन्यास न पुसतां इंग्रजास सनदा दिल्या. आणि डबईचिल्ला परगणा आपले बायकोंचे चोळी बद्दल घेतला. इंग्रज कुच करून मागें गेला असतां त्याज पासून सवाली करून, गोविंदबानें आपला अंमल बसविला तव्हां गोपाळराव वगैरे चौघे गृहस्थ पुण्याहून आलेले ते समजावीत अ-

---

* येथपासून अवतरण पुरे होईपर्यंतचा मजकूर वकिलाचे पत्रांतील घेतला आहे. हें म्हणणें, पाटीलबावांचे वकील कळवीत आहे. गोविंदबा गोविंदराव गायकवाड याचें वर्तन पुढें कळेलच. १ गाडर्ड ( इंग्रजी सरदार.

२ ईर्षा द्यावी. ३ आग. हें काम आहे तें बरोबर समजत नाहीं. तरी आपल्यास पैशाची ओढ आहे ती नानांनी पुरी करावी असें महादजीचें म्हणणें होतें. त्या संबंधीं हें बोलणें असावें असें वाटतें.

सतील कीं ' डभई, आमदाबाद, सरकारांत देतील.' तर आम्हांपासून याद नेली आहे कीं आमदाबाद डभई आह्मांकडे ठेवावी सरकारचा पैका मागूं नये. कोणेप्रकारें इंग्रजांतून गायकवाड काढावा. या अर्थे शर्त तुह्मी आह्मांस मिळाल्यावर, अशी शर्त घालून याद दिल्ही असतांही आले नाहींत, तेव्हां हरामखोर कीं हिंदू हें समजावें. त्यांचा विश्वास धरून त्याजकडे कारकून पाठवून राजकारण लाविलें. त्याजपक्षीं आह्मी हारामखोर ठरविलें तेव्हां गायकवाडाकडे, इंग्रजाकडे, राजकारण लाविलें. आम्हांस तोंडघशी द्यावें ही मसलत कारभारी कुडवितात. धण्याचें हीत करितात. आह्मांस लिहितात ' एक वर्ष लागो दोन वर्षे लागोत. नक्तनाबूद इंग्रज करावा. सलूख करणें तर नबाब, भोसले, नाईक, व सरकार, चौघांचे ममत करावा. ' आपण आंतून गृहस्थ पाठऊन राजकारणें करितात. कसें हा करून आह्मी तोंडांत खावी. हे मनोरथ सुफल होत. या उपरी आह्मी नर्मदा उतरत नाहीं. गाडर सुरतेस छावणीस जातो. कारभाऱ्यांनीं दादांस, इंग्रजांस मेळऊन घेतलाच आहे. तेव्हां दोन नाहींत. ' इंग्रजचेमान ' लिहितात. हें तर आमचे समाधानार्थ याचें उत्तर वीस बावीस दिवसांत +आणावें ह्मणोन पाटील बोवा बोलले ' म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें.—त्यांस विसाजी कृष्ण यांकडील कारकून मल्हारपंत पुण्यांत आहेत. व गोविंदराव चांभारगोंद्यांस आहेत तो आणविला आहे, असें असतां, दादाकडे सुरतेस गेला. आणि गाडराशीं गोंदवाचे विद्यमानें उत्तरें प्रत्युत्तरें जाहली हें फारच खरें वाटलें !! ' दोषलाऊन, चित्तास येईल तसें ' आम्ही कोणतें लिहिलें ? ज्या नव्या नव्या गोष्टी उत्पन्न करून संदेह घेऊन तुम्ही लिहितां त्याचे पाऱ्हेरे मात्र विस्तारें लिहितो. ' मसलतीचा जिमा ' हे तिकडूनच लिहित येत गेले. ते आम्ही सरळरीतिनें लिहित गेलों. सरकारचा मजकूर सुचला तो लिहिला. हें कांहीं वाकडेभावें करून लिहिलें नाहीं. कांहींच लेहूंनये, अशी मर्जी असल्यास तसें ही घडेल. दोष लागावा अशाभावें करून लिहिण्यांत येत नाहीं. स्वाभावीक चांगली गोष्ट मनांत येते. ती लिहीत असतों ' इरेस ' आह्मी काय

---

+ येथें पाटीलबोवांचें बोलणें पुरें झालें. १ हें:वकीलाचें बोलणें. पत्रांतील मजकूर ( वकीलाच ) येथें पुराझाला. २ येथपासून मानाचे उतरास सुरवात झाली.

घालावयाचें आहे. थोर आहेत. ते आपल्या एकनिष्ठेची व थोरपणाची इरे त्यांस असल्ये. बगलेंतील आगीचे पूर्वी बोलण्यांत येतच गेलें. येविषयींचें उत्तर जाहलें त्याचें स्मरण असेलच. 'साहित्य' ही होईल तेथवर करीतच आहों. 'इरेस घालून सरकार काम करून द्याव ही वाट आहे.' हें खरेंच. परंतु जे काम करीत नसतात. त्यांस ही गोष्ट योग्य. पाटीलबावांचें करणें तसें नाहीं. मन घालून सरकार काम काळजीनें करतात. तेव्हां इरे काय घालावयाची.? 'गोंदबा सरकारचे नाशास प्रवर्तक' असें कळल्यावर, आह्मी काय उणें केलें? रांडा पोरें धरून कैद केलीं. किल्यावर घातलीं. मनुष्याच्या रीतिनें पाटीलबावा तिकडे गेल्यावर + फत्तेशिंग येऊन भेटतील. गोंदबा कामावर पडतील. असें समजून रास्तीत गेलों. वांकडे, पाऊल दृष्टीस पडल्यावर मुलाहिजा केला नाहीं. हें ध्यानांत येतें कीं नाहीं? चोळी बद्दल माहाल घेतले. ती चोळी किल्यावर * आडकीवली आहे. आतां हे शास्त्रार्थ लिहून काय? पारपत्य केल्यावर अवघ्याच गोष्टी होतील. बोलणारच पुण्याहून कोणी गेले नाहींत. मग गोंदबाचें बोलणें 'डबई, आमदाबाद, सरकारांत देतील' हें काय धरावयाचें आहे? पाटीलबावांनीं 'बशर्तीची याद गायकडास लिहून दिल्ही.' ती समजून दिल्ही असेल. 'असें असतांही आले नाहींत तेव्हां हरामखोर कीं हिंदू! हें समजावें' ह्मणोन लिहिलें त्यास इंग्रजास भेटले, तेव्हांच हरामखोर. त्यावरही पाटीलबावा जात, तों मर्यादा होती. तेही गेली. असें समजूनच जफत्या करून, 'गोविंदराव गायकवाड यांस पद द्यावें' ह्मणोन लिहून पाठविलें तेव्हां समजूनच लिहिलें. 'इंग्रजाकडून गायकवाडास काढून पाटीलबावांस भेटवितों' असें गोपाळराव येथें बोलले. त्यावरून रामजीपाटलाच्या विद्यमानें त्याशी बोलून पाठविलें. हा मजकूर पूर्वी दोन तीन वेळां लिहिण्यांत आलाच आहे. या खेरीज दुसरा जाबसाल कांहीं नाहीं. त्याणें चिटी अथवा निरोप पाटीलबावांकडे पाठवावया होता. मग काय प्रतिबंध असेल ईश्वर जाणे!! दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां गायकवाड, इंग्रजाकडे, राजकारण लाविलें,

---

+ फत्तेशींग गायकवाड. हा गोविंदराव गायकवाडाचा बाऊ १ क्षमा.
* हें लिहिणें विनोदात्मक आहे.

गुडघा दिल्हा, असें घडतें कीं काय ! ' ही मसलत कारभारी बुडावितात ' ह्मणोन लिहिलें. त्यास कारभारी बुडवितात किंवा कशीं घडत आली हें ध्यानांत यावयाजोगेंच आहे. याचा विस्तार लिहितां फारच आहे. आंतून गृहस्थ पाठऊन दादा इंग्रज यांशीं राजकारण केलें नाहीं. ' वर्ष लागो दोन वर्ष लागोत ' इंग्रजांचें पारिपत्य करावें ' हाच निश्चय पक्का आहे. तह करणें, तरी चौघांचे विचारें करावा. जे निश्चय ठरले आहेत तेच कायम आहे. "इंग्रज बेमान. ' हें खरेंच लिहितों. प्रत्ययासही आलें आहे. व येईल. सुरतेस इंग्रज आला अथवा कोठेंही गेला. तरी पाटीलबावांसच पारपत्य करावें लागेल. करीतच आहेत. संशय कोणे विशीं घेऊं नये. रा छ १९ जमादिलावल हे विनंति. '

---

४

' राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसीं.

विनंति उपरी–' राजश्री पांडुरंगपंत यांणीं लिहिलें कीं नवेज जमादिवलचीं पत्रें बेविसावे मिनहूम सादर झालीं. त्यांत श्रीमंतांचीं पत्रें, राजश्री पाटीलबावांचे नांवे चार होतीं. ते पाटील-बावांस प्रविष्ट केलीं. व आपले नांवाचीं पत्रें व यादी पाहिल्या. तहप्रकरणीं चारी यादी पाटीलबावांस दाखविल्या. व आपल्या पत्रांपैकीं येक थोरली पुरवणी खेरीज करून वरकड दाखविली. या खेपचीं उत्तरें तीक्ष्ण आहेत पाहून उत्तर झालें कीं यांची उत्तरें करूं, भाईच्या शरिरीं समाधान नाहीं, परंतु तसेच बलाऊन आणिले त्यांस पत्रें दाखविलीं. सारांष पत्रें पाहिल्यावर, मर्जी ठीक दिसली नाहीं. उत्तरें जाल्यावर सविस्तर विनंती करीन. ' उत्तरांस दिवसगत लागते ' म्हणोन आपण लिहिलें होतें त्यास श्रीमंतांची पत्रें येतात. त्यांत भाव कसे ? व इकडील तर्तूद कशी ? हें सर्व ध्यानांत आहेच. उत्तरें लौकर होत नाहींत. याचे अर्थ उघ-

+ भाई राणाखान हा प्रथम भिस्ती होता. पानपतच्या गर्दीत महादजी-बावा पळतां पळतां घोड्यावरून पडले असतां, याराणाखानानें त्यास साह्य दिलें. व आपल्या पखालीच्या बैलावर बसवून दक्षिणेंत आणिलें तव्हां पासून महादजी यांस ' भाई ' ह्मणत असें त्यानें त्यास मोठ्यापदविस चढविलें पुढें पाटीलबावाच्या मोठ्या मोठ्या मसलतींत ही भाई असे.

हेच आहेत श्रीमंतांनीं यापेक्षांही अधिक लिहिल्यास यंदा यांच्यानें मसलत होत नाहीं. हे परिछिन्न उघड बोलतात. कीं आपण, होळकर, सारे निमूर बसून आह्मांवर दगड टाकितात. आह्मी इंग्रजांच्या मसलतीचा कसाला गुदस्तां पासून कसा केला. हें पाहावें. सारे तमाशा मात्र पाहतील व पहावा ही इच्छा आहे. एखाद्या जागा मसलती मुळें पेंचांत आल्यास, तिळा इतकी कुमक ह्मटली, तर कोणाच्यानें व्हावयाची नाहीं. असो बोलून फळ काय ? ज्याचा त्याणें आपला विचार पाहून करणें तें करावें. ' असेही विचार एकांतांत होतात. तेव्हां अंतरवेदची मसलत होण्याचा अर्थ यावरून ध्यानास येईल. तूर्त महिना पंधरा दिवस या प्रांतीं घालवून, छावणीच्या दिवसांत बहुत करून आवंतियेस जातील असें दिसतें. याजवर नकळे ' विस्तारें करून लिहिलें तें सविस्तर कळलें त्यास— * पेशजी पाटीलबावांनीं लिहिलें होतें कीं ' इंद्रसेन +हेष्टिना कडून सलुखाचे जाबसालास मुकत्यारीनें आला आहे. त्याशी हैदरखान सुद्धां सरकारचे मुद्दे मवाफक कसें बोलावें ?' ये विशीं लिहिलें होतें. त्यावरून इंद्रसेन मुख्य हेष्टिनानें तहाचें बोलणें बोलावयास पाठविला हा मुकत्यार असें जाणून पाटीलबावांनीं त्याशी, हैदरखान सुद्धां तहाचें बोलणें कसकसें बोलावें त्याची याद, व हैदरखानाचे मुद्यांची याद, वगैरे यादी पाठविल्या. त्या पाहिल्यावर मर्जी संतोष होऊन यादीबद्दल हैदरखान सुद्धां तहाचें बोलणें इंद्रसेनाशीं बोलावें. व त्याप्रमाणें आमलांत आणावें. असे भाव लिहून सविस्तर लिहिलें होतें. यांत मर्जी ठीक व्हावी असें नव्हे असो. बाह्यात्कारी मर्जी ठीक दाखविली असेल; परंतु पाटीलबावा[1] यादीच्या अन्वयें सरकारचे मुद्दे मवाफक हैदरखान सुद्धां तहाचें बोलणें इंद्रसेनाशीं बोलून अमलांत आणितील, ही खातर जमा आहे. ' हे उघडे बोलून दाखवितात कीं आपण सारे होळकर[2] सारे निमूर बसून, आह्मांवर दगड टाकितात. आह्मी इंग्रजाच्या मसलतीचा कसाला गुदस्तांपासून कसा केला. हें पहावें सारे तमाशा मात्र पाहतील. तिळा इतकी कुमक व्हावयाची नाहीं असो. ज्याचा त्याणें आपला विचार

१ महाराजीच्यानें. २ महादजी. ३ हें बोलणें नानांस उद्देशून आहे.

* येथ पासून नानांचे उत्तरास आरंभ झाला. + वॉरन हेस्टींग्स पहिला गव्हरनर जनरल.

पाहून करणें तें करावें. असे विचार एकांतांत होतात.' ह्मणून लिहिलें त्यास गुदस्तां पासून पाटीलबोवावर कसाला इंग्रजांच्या मसलतीचा पडला. परंतु तितकाही कसाला सोसून पुढें मसलत करणें, ही योग्यतां पाटील-बोवाचीच होय. पाटीलबोवावर तर गुा पासून मसलत पडलीच. परंतु इकडे गुा गाडर बोरघाटावर येऊन मसलत पाडली तेव्हां पडा जवळ. मसलत समीप पडली तेव्हां करणें प्राप्त. सरकारांत पैक्याची अडचण को-णप्रकारची तथापि अडचण सोसून, फौजेचा जथ पाडून, इंग्रजावर मसलत केली. मातबर सरदार होळकर ही समयास आले. इंग्रजांची व सरकारची लढाई होऊन इंग्रज शिकस्त खाऊन कोण्यातऱ्हेनें माघारां गेले त्याची पायमल्ली किती जाली. कोणेतऱ्हेनें गेला. हें सविस्तर वरचेवर पत्रें लिहून गुा पाठविलीं होतीं त्यावरून ध्यानांत आलें असेलच तेव्हां तमाशे पा-हतात. किंवा मसलत केली. हें ध्यानांत येतच असेल. सालमजकुरीं तर तहाचेंच बोलणें बोलावयास इंग्रजानें वकील पाठविला आहे. त्याशीं बो-लणें पाटीलबावा बोलतच आहेत. तेव्हां हैदरखानासुद्धा सरकारचा तह पाटीलबावा चांगलाच करतील. ही खातर जमा आहे. पाटीलबावा कसें करतात! हा तमाशा पाहावा. हे इच्छा येथील नाहीं. मोठीं मोठीं कामें पाटीलबावानें करावीं. सरकारचे मातबर उपयोग तेंच घडत असावें, आणि पाटीलबावाचें कल्याण असावें. सरकारच्या मोठ्या मसलती होऊन पाटीलबावांस यश यावें. भाऊपण्यांत अंतर पडूं नये ऐसें घडावें. हाच संतोष मोठा आहे. याप्रमाणें पाटीलबावा करतील ही खातर जमा आहे. तिकडे परावा मुलूख मसलत केल्यानें, मनसबा होऊन पैकाही मिळेल. असें आहे. व खालीं मैदान या करतां सुचतें तें लिहितों. आपलाच आपण नाश करून घ्यावा. असें ज्याचे चित्तांत असेल त्याचे मनांत तमाशा पा-हावा असें येईल तर कळेना. येथील समज अशी नाहीं. राा छ १४ जमादिलाखर हे विनंती.

---

५

'राजश्री नारोपंत स्वामीचे शेवेसीं.'

विनंती उपरी '*होळकर प्रकर्णी पांच चार वेळ पत्रें सपशीलें करू-

*येथपासून नारोपंतांकडून आलेले पत्रांतील मजकुरास आरंभ झाला आहे.

न सादर झाली. त्याप्रमाणें राजश्री पाटीलबावांशी बोलत गेलों. परंतु ज्या समयीं होळकराकडील मजकूर काढला. तेवेळेस मारींबोलणीं एकीकडे च्यार च्यार घटका वादमतिवाद होत गेले पाटीलबावांचें ह्मणणें कीं ' खावंदाचे घरींहून जाबसाल होणें ते यथायुक्त होत असावे. पूर्वींच्या चाली पहाव्या. तीं थोरणें पुढें चालवीत असावीं. न ऐकेल त्यास समजून सांगावें. तें न होतां * बाईस संपुष्टांत घालावें. अशीच साऱ्यांची मर्जी एकास दिसल्ये. यावरून आश्चर्य आहे. अहिल्याबाई होळकरांचीसून, तिचा अपमान केला असतां लौकिकांत ठीक दिसेल कीं काय ? तीही केवळ अपमान करून घ्यावयाजोगी नाहीं. होळकरांनीं फत्तरगडचे आलिकडे आज पावेतों चाकरी कोणती केली ? सरंजामाचा वसूल आज पावेतों किती आला ? यांचे आमचे महाल बरोबरीचे आहेत, त्यांत त्यांचे महालचा वसूल, आमचे महालापेक्षां कमी कां आकारतो ? याची पुरशी धनीपणाचा कारभार जिकडे असेल त्यांनीं करावी. एकाचाच पक्ष धरून बोलणें युक्त नाहीं. ' अशीं बोलणीं झालीं. पाटीलबावांनीं पत्र येविशीं लिहिलें आहे. आहिल्याबाई कडील याद आली ती पाटीलबावांनीं दिल्ही ती पाठविली आहे. पावेल. ' * ह्मणून विस्तारें मजकूर लिहिला तो सर्व कळला. त्यास आहिल्याबाई कडील याद पाठविली ती पाहिली. त्यास अशा यादी मागेंही एक दोन वेळ आल्या त्यास अशा यादींनीं काम कांहीं व्हावयाचें

---

* बाई अहिल्याबाई होळकरीण—भार्यभू खाणींतून निघालेल्या स्त्री रत्नापैकीं हें एक अतितेजस्वी रत्न होऊन गेलें. हिची थोरवी खालील आर्यावरून चांगली दिसून येईल.

' देवि अहल्याबाई झालीस जगत्रयांत तूं धन्या.
न न्याय धर्म निरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या.
श्री विष्णुपदा स्तविली त्वद्भक्ता हें तुलाहि मानावें
विश्वजिला वानितसे कां न मयूरें ही तीस वानावें '

मोरोपंत.

* येथें वकिलाचे पत्रांतील मजकूर पुरा होऊन नानांचे उत्तरास सुरवात झाली.

नाहीं. काल हरण होतें. येविशींचे तपशीलवार उलगडून पूर्वीं दोन चार वेळां लिहिलें आहे. त्याचें उत्तर असें सांगतात कीं ' त्यांचे वाक्य वेदतुल्य ऐकोन लिहितात ' त्यास वेदतुल्य वाक्य ऐकावयाचें नाहीं. वास्तविक गोष्ट असेल तीच लिहिली असेल. ' सर्वांचे मनास बाईस संपुष्टांत घालावें असें आहे ' ह्मणून बोलले त्यास बाईस संपुष्टांत घालावयाचें प्रयोजन काय आहे ? सरकार काम व्हावें. मातबर सरदारी दिवस मसलतीचे समीप आले. फौजेची तयारी झाली पाहिजे. विनापैक्या खेरीज फौज जमा कशी होते ? या करतां पूर्वीं तपशीलवार लिहिलें होतें. त्याचीं उत्तरें अशीं यावीं कीं काय ? असो तुह्मी पूर्वीं लिहिलें आहे. त्या अन्वयें पाटीलबावांशी बोलून, पाटील बावांचेंपत्र पाठवावें कीं ' तेथील डौलाचेखर्चापुरता ऐवज पाटीलबावांनीं ठेऊन तेथील वहिवाट बाईकडील माहालकरी तिही माहालीं आहेत. त्यांनीं करावी. बाकीचे माहाल राहिले त्यास होळकरांस मसलत संबंधें पैका लागेल तो बाकीचे माहालांपासून घेतील ' असें बाईस पाटीलबावांनीं निक्षूण लिहिल्या शिवाय तोड पडत नाहीं. असें पत्रापत्री मजकूर वारंवार लिहिले असतां कांहीं काम होईल असें वाटत नाहीं. मसलतीचे दिवस जवळ आले. फौजेची तयारी होऊन, चाकरीचे उपयोगी पडली पाहिजे. याजकरितां लिहिल्याअन्वये तुम्ही बोलून, बाईस पत्र पाटीलबावांनीं पाठवावें. ह्मणजे तोड पडेल नाहीं तर पडावयाची नाहीं. फौज किती बाळगली ! माहाल खराबका ! चाकरी काय केली ? हे जावसाल पुसावे तर दुईमुळें अवघेच जावसालास पाणी पडतें. सरकारची नुकसानी मात्र भारी. हें खरें. दुई नसल्यास इतकेही जावसाल पुसावे नीट करवावे. सरकार मसलतीस उपयोग पडावा. इतकेंही करतां येतें. असो ; लिहिल्या अन्वये बाईस लेहून पाठवावें आणि अमलांत येई तें करावें. बाईस संपुष्टांत घालावी हे गोष्ट येथें नाहीं. असती तर ते मार्ग निराळे घडत जात. पूर्वील सांप्रदायावर जावे तर दुई नसतें तेव्हां कोठेंच पेंच पडत नाहीं. विरुद्ध पडल्यावर सरदारी कोणीकडे ? त्यांचें कसें व्हावें ? याचा विचार करावा लागतो. हें सर्व ध्यानांत आणावें. रा छ १ जिल्काद हे विनंती.

---

# भाग ३

## इंग्रेजांशीं झालेले युद्धासंबंधी नानांचे लेख.

**नयत्रस्थेमानं दधुरतिभयभ्रांत नयना**
**गलद्दानोद्रेक भ्रमदालि कदंबाः करटिनः**
**लुठन्मुक्ता भारे भवतिपर लोकं गतवतो**
**हरे रद्यद्वारे शिव शिव शिवानां कलकलाः**

(जगन्नाथराय—भामिनी विलास.)

महाराष्ट्र राज्यसूत्र चालकांनीं आपण होऊन इंग्रजांशीं कधींही विरोध केला नसतां न्यायान्यायाचाविचार बाजूस ठेऊन इंग्रेजांनीं राघोबास पाठीशीं घातलें, व मराठ्यांशीं अकारण कलह उत्पन्न केला. मराठ्यांस चीत करून टाकण्याकरितां जनरल गाडर्ड, क्याप्टन स्टुअर्ट, इत्यादि इंग्रजवीर अस्तन्या वर चढऊन रणांगणीं आले. या प्रचंडवीरांचे पोवाडे त्यांच्या जातभाई 'इतिहास कर्त्यास जें खरें दिसेल तेंच त्यांनीं लिहिलें पाहिजे,' असें म्हणणाऱ्यास इतिहासकारांनीं मोठ्या भक्तीनें गाईले आहेत. व आमच्या निःपक्षपाती सरकारानें ते पोवाडे रोजचेरोज गायन करण्याचें आह्मांस मोठ्या मेहरबानीनें भाग पाडिलें आहे. परंतु या प्राच्यपाश्चात्य युद्धांत खरोखर काय काय रंग झाले, मराठ्यांचे भाले मोडले कीं इंग्रेजांच्या संगिनी बोथट झाल्या, चढाई करून आलेले इंग्लिशवीर जय पावले, कीं मराठ्यांनीं त्यास धुडकाऊन लाविलें. हें समजणें फार अगत्याचें आहे सबब याविषयीं नानांचे लेख काय आहेत तें आपण पाहूं.

---

राजश्री नारोपंत[१] स्वामीचे सेवेसी-

विनंति उपरी प्रस्तुत इकडील वर्तमान तर छ ३ रविवारीं खोपवलीहून चार पलटणें, तोफा वगैरे सरंजाम घेऊन मजकुरीनें पनवेलीस

१ हे नानांचे महादजी शिंद्याकडे असलेले वकील.

रस्त आणावया करितां रात्रीस कूच करून जाऊं लागलीं. तों राजश्री परशुरामपंतभाऊ यांची बातमी होतीच यांणींही रात्रीसच जाऊन गांठ घातली. निकड करून लढाई लागली तों पेंढारी लागूनच होते. शेंदीडशें माणूस ठार व दोनशें पावेतों जखमी इंग्रजा कडील केले. तीन चारशें बंदुका व दाहावारा उंट व छकडे दारूगोळयांचे व डेरे राहुट्या व चार साडेचार हजार बैल त्यावर कांहीं जिनशी व कांहीं रिताडाचे याप्रमाणें पाडाव आणिले. उजाडतां मुक्काम त्याचा बारवईवर अडचणीच्या जाग्यांत झाला. त्यावर दुसरे दिवशीं रात्रीस कूच करून जाऊं लागला. तों यांणीं गांठ घातली. शेंपन्नास त्यांकडील माणूस मारले. व हजार बैल पाडाव आणिला. इकडून बाणांची मारागिरी केली. त्यागें त्यांकडील दारूचे छकडे होते त्यांस आग लागोन त्यांकडील माणसें फार जळालीं रात्रीसच पळून पनवेलीस गेले. बरावर दीड दोन हजार पावेतों बैल राहिला तो बरोबरच नेला. त्याजवर जरब बसून नाश फार जाहला. याकरितां मुंबई कडील पलटणें घेऊन मजबुदीनें तिकडून येतील व घाटावर एक तोंडी लढाई नित्य तोफा घेऊन जाऊन मारगिरी करावी तेही करतात. घाटावर बतेऱ्या बांधून अडचणींत राहिले आहेत पुढें वाढून येत नाहींत तेव्हां कामही मातबर होत नाहीं याकरितां राजश्री तुकोजी होळकरही फौज सुद्धां कोळंब्या घाटानें कोंकणांत गेले. भाऊ व हे एक होऊन तिकडून रस्त घेऊन येतील, त्यावर निकड करतील. राजश्री पाटीलबावांस पत्र लिहिलें आहे. तें प्रविष्ट करावें रा। छ १२ रविलाखर हे विनंति.

याच संग्रामाची पुढील हकीकत ऐका:—

---

' राजश्री पाटीलबोवा गोसावी यांसी:—

आशिर्वाद विनंति उपरी पनवेलीहून पांच पलटणें गाडराकडे बोरघाटास येत होती, त्याजवर राजश्री तुकोजी होळकर व राजश्री परशरामपंतभाऊ यांणीं निकडीनें लढाई करून इंग्रजांकडील नाश फार केला. हें पूर्वी सविस्तर लिहिलेंच आहे. त्यावरून कळलें असेल. घाटावरूनही राजश्री हरिपंतांनीं तोफा, त्यांच्या बतेऱ्या नजीक नेऊन मारगिरी इंग्रजावर फार केली. व त्यांनीही मारागिरी भारी केली. छ

२३ रविलाखरीं रात्रीस गाडर आपले सरंजामासुद्धां घाबरा होऊन घाटाखालीं उतरला. तें वर्तमान हरिपंतांस कळतांच फौजसुद्धां घाटावर जाऊन तोफांची व बाणांची मारगीर केली. त्यावर दुसरे दिवशीं खालून गाडरानें कुच करून जाऊं लागला. तों होळकर व परशुरामपंत फौजसुद्धां तिकडून आडवे होऊन इंग्रजावर निकड केली. व हरिपंतही फौजसुद्धां वरोन तीन तोफा घेऊन घाटाखालीं उतरून पाठीमागून निकड केली. हजारों गोळ्यांचे छकडे व गाड्या व डेरे राहुट्या वगैरे पाडाव आणिले. लढाई दुतर्फाही चालली आहे. ह्मणोन पत्रें आलीं मागाहून होईल तें लिहून पाठवूं. आपल्याकडील वर्तमान सविस्तर वरचेवर लिहून पाठवीत जावें. ग्वाल्हेरी सीमरथकर गुजरांनीं घेऊन आपणाकडे पत्रें पाठविलीं, ह्मणोन वर्तमान ऐकलें त्यावरून संतोष जाहला. परंतु आपलें पत्र सविस्तर वर्तमान लिहून आलें नाहीं. या दिवसांत इंग्रजांकडून ग्वाल्हेर आली ही मोठी गोष्ट लौकिकास व मसलतीस चांगली जाहली. प्रस्तुत इंग्रज कोठें आहे. वगैरे सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. इंग्रजावर फौजांची निकड बसून लढाई होत आहे. घाबरा झाला आहे. रा छ २९ रविलाखर बहुत काय लिहिणें लोभ असोदिजे हे विनंति.'

---

' राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी.

विनंति उपरी इंग्रजांची तरांडीं मुंबईहून बिदनुराकडे जात होती. त्याजवर इंग्रजाकडील मातबर सरदार होता. त्यास तीं तरांडीं धुळपांनीं सरदारसुद्धां पाडाव करून आणिलीं. त्याविशीं सरकारांत मुंबईकरांचे पत्र आलें कीं सरकारची आमची दोस्ती. यापक्षीं तरांडीवरील सरदार व लोकसुद्धां सोडून देववावीं त्याजवरून तरांडीं सरदार व लोकसुद्धां धुळपांस लिहून सोडून देवविलीं. वर्तमान तुह्मास कळावया करितां लिहिलें आहे. तरांड्यावरील इंग्रेजाकडील लोकांनीं लढाई मातबर दिल्ही. धुळपांनींही चांगलीच लढाई देऊन दस्त केलें परंतु तह झाला त्यापक्षीं सोडून देवविले. रा छ ३ रजब हे विनंति.'

---

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरी राजश्री पांडुरंग रघुनाथ यांणीं छ १२ जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. धुळपांनीं इंग्रजांचे तरांड्यांशीं लढाई देऊन धरून नेली त्याविशीं इंद्रसेनास मुंबई सरकारांनें लिहून पाठविलें. त्याणें पाटीलबावांस सांगोन पाठविलें त्यावरून पाटीलबावा बोलले येविशींचामजकूर बोलल्याचामजकूर लिहिला तो विस्तारे करून कळला. त्यास धुळपांनीं तरांडी व सरदार व लोक होते त्यासुद्धां केले. ते तह जाला त्यापक्षीं सोडून द्यावी. तों मुंबईकरचिंही पत्र आलें त्यावरून धुळपांस लिहून तेंव्हांच सोडून देविलें. येविशींचा मजकूर पेशजीं लिहून पाठविला. त्यावरून कळलाच असेल. धुळपांस तह जाहल्याचें वर्तमान समुद्रांत कळलें नव्हतें. येथून लिहून पाठविल्यावर सोडून दिल्ही. ती मुंबईस सरदारसुद्धां पावली ह्मणोन मुंबईकराचें पत्रही सरकारांत आलें. रा छ १९ रजब हे विनंति.

---

एका पत्रांतील चालू विषयासंबंधीं उतारा देतो.

'गाडराची लढाई सुरू झाली. या उपर वर्तमान वरचेवर येत जाऊन आह्मांस कळवित जावें. असें राजश्री पाटीलबावा बोलले ह्मणुन लिहिलें. त्यास जें वर्तमान होत गेलें तें लिहित गेलों. पुढेंही वरचेवर लिहून पाठवीत जाऊं. प्रस्तुत गाडर सवामहीना बोरघाटावर येऊन झाला. अर्धा सरंजाम खालीं ठेविला आहे. अर्धा वरता आहे. अडचणीची जागा धरून दतेऱ्या बांधून तोफा ठेऊन राहिला आहे. राजश्री हरिपंत व होळकर पंचवीस तीस हजार फौजेनिशीं कारल्या नजीक आहेत. नित्य तोफा घेऊन जाऊन लढाई होत असत्ये. कोंकणांतून पिछाडीवर राजश्री परशुरामपंतभाऊ बारा हजार फौजनिशीं आहेत. तेही खालील पलटणावर निकड बरीच कारतात. परंतु अद्याप घाट सोडून पुढें येत नाहींत. यापुढें वर्तमान होईल तें लिहून पाठवूं.

---

'राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

'विनंति उपरी राजश्री पांडुरंग रघुनाथ यांणीं छ २७ जमादिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें पुढें

होईल वर्तमान तें वरचेवर लिहून पाठवीत जावें. 'ग्वाल्हेर' किल्यास उरवाईकडून तोफांची मारगिरी व मोर्चे लाविले आहेत. सुरुंगही चालतो ह्मणून पेशजीं लिहिलें होतें त्यावर प्रस्तूत तो सुरुंग उडविला. त्यावरून उरवाईचा बुरूज तीन हिस्से पडला. हल्लीं आणखी दोन तीन सुरुंग चालविले आहेत तोफांची मारगिरी सुरूच आहे. खासा स्वारी मोर्च्यावर जात असते.' ह्मणोन लिहिलें तें कळलें. त्यास उरवाईचा बुरूज तीन हिस्से उडाल्यावरून त्यासही विचारच पडला असेल. आणखी सुरुंग लाविले त्यापक्षीं घाबरे होऊन सूत्र[१] लावितील असें वाटतें. पुढें वरचेवर वर्तमान लिहीत जावें. रा छ २५ जमादिलाखर हे विनंती.

---

'राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंती उपरी तुह्मी छ ११ रविलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. 'गंगाजी राजश्री पाटीलबावांजवळ सडे स्वारींत आहे त्याचें पत्र छ ९ तारखेचें आलें तेंच वजिनस पाठविलें आहे. त्यांत फौज जमा होऊन इंग्रजास घेरा घालून आहेत, व ग्वाल्हेरचें वर्तमान लिहिलें आहे विदीत होईल' ह्मणोन लिहिलें तें कळलें व गंगाजीचें पत्र पाहिलें. फौज जमा होऊन इंग्रजावर नित्य लढाई होत्ये फार उत्तम आहे. पुढें इंग्रज कोणीकडे रोख धरतो ? व पाटीलबावा तर्तुद काय करतात ? हें लिहून पाठवावें. ( पुढें एक ओळ फाटली असून त्यांत ग्वाल्हेर आल्याचा मजकूर असावा ) लिहिलें आहे. त्यास ही गोष्ट मोठीच झाली. ग्वाल्हेर सरकारांत आली येणेंकरून इंग्रजाचा थारा मातबर मोडला. व मनसब्यासही उपयोग पडला. पुढें होईल तें वरचेवर शोध चांगला करून लिहून पाठवीत जावें. इकडील वर्तमान राजश्री पाटीलबावास लिहून पाठविलें आहे. हें प्रविष्ट करावें. त्या पत्रावरून तुह्मांसही सविस्तर मजकूर कळेल. इंग्रज बाबरा होऊन माघारा जात आहे. इकडील फौजांची निकड बसली आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं रा छ २९ रविलाखर हे विनंती.'

---

१ सूत्र लावितील तहाचें बोलणें सुरू करतील.

'राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंती उपरी 'राजश्री पाटीलबावा व फौज एकत्र होऊन इंग्रजांचे भोंवते एक दिवस फिरून तीन कोसांवर मुक्काम आहे तेथें आले दुसरे दिवशीं तोफा तयार करून घेऊन गेले. तों इंग्रज भेलशाचे सुमारें दोन कोस आले होते. ते माघारे सुरतेजवळ जाऊन, पुढें पाव कोसावर बतेऱ्या बांधून तोफा ठेऊन मारगिरी करतात. पाटीलबावांबरोबर दोन तोफा लंबछड्या[1] आहेत. त्यांचे गोळे इंग्रजांच्या मुक्कामापावेतों जातात; परंतु त्यांणी काम व्हावें असें नाहीं यास्तव भेलशाहून दोन तोफा भारी[2] आणावयास पाठविले आहेत. ते आल्यावर निकड करणार. इंग्रजाचा जोर भारी पडेलसा नाहीं. इंग्रज सुरतेजवळ आला, येणें करून पोटाची बेगमी आहे. लष्कराबाहेर त्यांकडील कोणी येऊं पावत नाहीं. पाटीलबावाजवळ फौज पेंढारसुद्धां वीस हजार आहे, निकड केल्यास लौकरच कार्य व्हावेंसें आहे.' ह्मणून लिहिलें तें कळलें. त्यास इंग्रज मैदानांत आले आहेत. त्यावर पाटीलबावाही खुद्द फौजसुद्धां गेले आहेत. जयही त्राच पडत चालला आहे. तेव्हां निकड करून पारपत्यच करतील. ही खातरजमाच आहे. भेलशाच्या तोफाही येऊन पोंचल्याच असतील. भोंवताली बंदी इंग्रजांच्या पक्की करून भूल करून मग निकड केल्यास काम चांगलें होईल. युद्धाचे कामास पाटील बावा दिक्षित येथुन ल्याहावें असें नाहीं. 'भूपाळकर फौज पाठवितों ह्मणून पत्रें पाठवितात. अद्याप त्यांकडील कोणी आलें नाहीं' ह्मणोन लिहिलें त्यास भूपाळकर यांचा विश्वास धरूनये. खासा अथवा फौज पाठविली तथापि सावधता * असावी. भूपाळकरांचीं पत्रें येथें आलीं होतीं कीं, 'वकील पाठवितों' त्याचें उत्तर पाठविलें कीं, इंग्रजांचे पारिपत्यास तुह्मी जाऊन राजश्री पाटीलबावांस सामील व्हावें. व वकील इतबारी पाठऊन द्यावा. हें वर्तमान तुह्मांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. गा छ २३ रबिलावल हे विनंती.'

---

१ ज्यांचे गोळे लांब जातात अशा ? २ मोठ्या.

* नानांची अटकळ कशी खरी होत असे, हें या लिहिण्यावरून चांगलें दिसून येतें. भूपाळकर खरोखरच इंग्रेजांस मिलाफी झाले होते. महादजी समीप असतां त्यालाही गोष्ट कळली नाहीं, परंतु नानांनींतर ती पुण्याहूनच जाणली !

' राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

' विनंती उपरी तुह्मी छ ४ रविलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. ' राजश्री पाटीलबावा दरकुच खामखेडेनजीक भेलसें पांच कोस येथें गेले. इंग्रज सिप्रीं पासून मुरतेपावेतों ठाणीं बसवीत आले. तों आंबोजी इंगळे, व सदाशीव मल्हार यांच्या त्यांच्या लढाया होत आहेत. तुरकस्वार पुढें वाढून आले होते. त्यावर लढाई करून कांहीं मारले कांहीं पळाले. दोन चार धरून आणले. तों पाटीलबावा आल्याचेंवर्तमान ऐकून पुढें यावयाचें महकूफ होऊन सुरतेजवळ मुक्काम केला. राणेखानभाई पुढें फौज घेऊन गेले. खेचीराजगडवालेही आले. फौजा जाऊन पोंचल्या रस्त बाहेरील बंद केली. सिप्रीपासून ठाणीं बसवीत इंग्रज आले. तीं ठाणीं चंदेरीकर यांणीं पाठविलीं. ते पाटीलबावास येऊन सामील होणार. इंग्रजांचा संदर्भ आला आहे कीं ' आम्हांस माघार जाऊ द्या ' ह्मणतात असें लिहिण्यांत आलें आहे. पक्कें लिहून येईल तेव्हां लिहून पाठवूं. आपल्याकडील वर्तमान इंग्रजाचें येत नाहीं. म्हणोन तेथें बापूजी रघुनाथ ठेविले आहेत. त्यांजपाशीं म्हणत होते. परभारें त्यांस वर्तमान गाडर बोरघाट चढून वरता आला हें कळलें ह्मणून पुसत होते. ' ह्मणून लिहिलें तें कळलें. त्यास पाटीलबावा भेलशानजीक जाऊन पोंचलें उत्तम आ[?]लें. इंगळे व बर्क्षीची तुरकस्वारांशीं लढाई झाली. त्यांत जे तुरकस्वार सांपडले, त्यांची जबानी इंग्रजाचे लष्करचेंवर्तमान सविस्तर पुसून लिहून घेऊन पाठवाव्या. व इंग्रजाबरोबर सामान खरेंखुरें किती आहे. हाही शोध घेऊन लिहून पाठवावें. व खेचीराजगडवाले यांची व आपली फौज मिळून खरी फौज आपले मिळून किती? हें सविस्तर लिहून पाठवावें. बाहेरील रसद बंद केली. या प्रमाणेंच चौतर्फा बंदी चांगली केल्यानें. आयास येतील. चंदेरीवाल्यानें कोणकोणतीं ठाणीं उठविलीं? पाटीलबावांस कधीं येऊन भेटणार? त्यापाशीं जमाव किती आहे? हें लिहून पाठवावें. ' माघारे जाउंद्या ' ह्मणून इंग्रजांचा संदर्भ आला आहे. त्यास ते दगाबाज आहेत. त्यांचें कदापि ऐकूं नये. संदर्भ लाऊन फौज चहूंकडे गेली ह्मणजे मैदानांत सांपडले आहेत. पारपत्यच मागती चाल[१] करतील. आयते

[१] जरास.

होयतें करावें. गाडर बोरघाट चढून आल्याचें वर्तमान इकडील सविस्तर पूर्वीं लिहून पाठविलेंच आहे रा छ २१ रविलाख्ख्ल हे विनंति. '

---

' राजश्री विसाजीपंत व सदाशिवपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंति उपरी गणेशपंत बेहेरे यांजवर इंग्रजांनीं छापा घातला ते समयीं थोडीशी लढाई झाली. मशारनिल्हेस दोनतीन जखमा लागल्या. सांभाळून निघोन हातगडाकडे आले. हें पूर्वीं लिहून पाठविलेंच होतें. ते इकडे येतांच तिकडे पारनेरयावर इंग्रज जाऊन मारगिरी किल्यावर केली. दोन तीन हल्ले किल्लेकऱ्यांनीं मारून काढले. आतांच वर्तमान आलें कीं किल्ला त्यांनीं घेतला. पुढें ही ठाणीं घेत येणार. राजश्री सखारामपंत पानशे, व बाजीपंतजोशी फौजसुद्धां कल्याणाकडे होते. त्यास मद्रासेहून तीन हजार माणूस इंग्रजांचें गलबतांतून आलें. व सुरतेहून दोन हजार माणूस मुंबईस आलें. ते मिळून वसईवर येणार. अशा बातम्या निकडीच्या आल्या. त्यावरून उभयता मशारनिल्हे वसईकडे गेले. कल्याणाकडे दुसरी फौज रवाना केली. परजन्याचे दिवस फौजेचें राहणें कोंकणांत कठीण. इंग्रज पायींचीं माणसें. त्यास पर्जन्याचा विधिनिषेध नाहीं. आणि त्यांचा जमाव तर इकडे भारी होत चालला. व कोंडाईबारी पावेतों येऊन तिकडील बंदोबस्त करणार याकरितां उभयतां सरदारांकडील दाहा हजार फौज लौकर जलद कोंडाईबारीवर पाठवून छावणी करावी. मागाहून उभयतां सरदारांनीं ही लौकर यावें. राजश्री पाटीलबावांनींही या गोष्टीची तर्तुद केलीच असेल. राजश्री परशुरामपंत भाऊ यांजकडील वर्तमान शिरोळ घेतलें व कितूर घेत त्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. भाऊ गोकाकाकडे गेल्यावर येसाजी शिवदेव, सटवाजी भोसले, व मानाजीशिंदे त्रिवर्ग मिळून हजार बाराशें राऊत व दोनहजार प्यादा असे कोल्हापुराहून बाहेर निघून दौडकरून गांव मारूं लागले. जयरामस्वामीचें वडगांव लुटलें, हें वर्तमान भाऊस कळल्यावर चार हजार फौज त्रिवर्गावर रवाना केली. त्यांनीं येऊन गांठघातली. लढाई झाली. तिघेजणांचा मोड झाला. तीनशे घोडे पाडाव आणिले पायेचे लोक व स्वार त्यांजकडील फार मारले गेले. शेवटीं सडे दोन तीनशें रावतांनि-

शीं पळाले ते सामान गडच्या माचीस गेले. तेथपावेतों पाठलाग केला. या प्रमाणें वर्तमान झालें तें कळावें याकरितां लिहिलें आहे. कितुरकरांकडील सरकारचीं ठाणीं येणें व कोल्हापूरचा बंदोबस्त राखणें याकरिता कृष्णेपलीकडे छावणीस फौज पांचहजार ठेवावी लागेल. रा छ ११ जमादिलाखर हे विनंति.

---

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री
दिनकरपंत स्वामीचे शेवेशीं

पो बाळाजी जनार्दन. साष्टांगनमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असावें. विशेष तुह्मी पत्र पाठविलें तें पावलें लिहिला मजकूर सविस्तर कळला.—'पो महतपुर व पो शाहाडौरा व पो कालाबाग व आहिरवाड्यांतील वगैरे ठाणीं, इंग्रजानें घेतलीं होतीं. त्याजवर आह्मी व राजश्री यादवराव हरि दीमत त्र्यंबकराव नारायण राजे बहादर, यांनीं मिळोन चंदेरीच्या राजास सामील करून शिबंदी ठेऊन, इंग्रजाचीं ठाणीं उठवून आपलीं ठाणीं बसविलीं आहेत.' ह्मणोन लिहिलें ऐशी यास इंग्रजाचीं ठाणीं उठविलीं. उत्तम केलें. त्यास ठाणीं घ्यावयासी खर्च कार्याकारण जरूराती जाहला असेल. त्याचा हिशेब राजश्री नारो शिवदेव, यांस समजावावा. ते समजोन खर्चाची हिसेरसीदकरून माहालावर ऐवज बसवितील तो सरकारी व सरंजामी माहलचे कमावीसदारपासून घेऊन, ठाणीं त्यांचे स्वाधीन करावीं. इंग्रजापासून ठाणीं व तुह्मी व मशारनिल्हेनीं घेतलींत येविशीं तुमचें व त्यांचें बोलणें आहे. त्यास तुह्मी हुजूर यावें. समजोन करावयासी येईल रा छ ६ जमादिलेवल बहुत काय लिहिणें लोभकरावा हे विनंति.

---

सरतेशेवटीं नानांस टिपूचें पत्र आलें, त्याची नकल त्यांनीं पाटीलबावांस दाखविण्याकरितां, नारोपंताकडे पाठविली ती येथें दाखल करून हा भाग आटपतों.

---

१ परगणें ?

' पंडत अजम बाळाजी पंडत फडणवीस.

* सलमहुता ले

साहेब मेहेरबान करम फर्मान मुखलिसा बादन शोक मुलाकात मसरत आयात इतीहाद मासरबाद येथील खुशी जाणून, आपली शादमानी कलमी करीत यावे. दिगर इंग्रजाचा तालुका कितेक मातबर गड किल्ले वगैरेस ठाणें घालून आर्काटापाशीं आम्ही फौजसुद्धां उतरले मजकुरास पेशजीं लिहिलें होतें. त्यावरून मालुम जाहलें असेल. चेनापट्टणाहून जनराल मंडोर नामें फिरंगी सरदार दोन हजार गोरे फिरंगी, दहा हजार बार आ-ठशे तुरकस्वार व तीस तोफा, व चार गरनाला, वगैरेसुद्धां लढाईच्या इराद्यानें कंचीस आल्याची खबर आली. त्यावरून आह्मी आर्काटाहून कूच करून, कंचीस पोंचून त्याचे फौजेस घेरा दिल्हा असतां, गुटूर, मछलींबंदराहून, याचे कुमकेस करनेलबेली नामें उमदा सरदार, चारशें गोरे फिरंगी, व पांच हजार बार, व तोफा वगैरे जंगी सरंजामानशीं येतो. हे खबर पो-हचतांच त्याचे तंबीकरितां इकडून फौज पाठऊन घेरावेरी व मारामारी करविली. तेव्हां ते जमियत पुढें येऊं न सकतां कंचीपासून चार को-सांचे फासल्यानें गढीचा आसरा घेतला. त्याचे उपराळ्यास कंचीहून जनराल मंडोर याणें आपले हामराइ फौजेपैकीं, बेसचडनंदी ( ? ) पां-चशें गोरे फिरंगी, व दोनशें तुरकस्वार, व निवड्ड ( क ) दोन हजार बार, व पालखीनशीन पंधरा सरदार मातबरसुद्धां कंचीस एक बाजूनें नदी होती तिकडे तलावा ठेविला नव्हता, त्याराहानें पाठविले. तेव्हां करनेलबेली नामे सरदार याणें पहिले आपणापाशीं जामियेत होती. ते व कंचीहून कुमकेस जमियेत गेली, त्यासुद्धां जमियेत घेऊन इकडील फौ-जेशीं. लढाई करीत येतो, हे खबर आल्यावरून त्याचवक्तीं कंचीस कुकपोशाचे ( ? ) फौजेवर कितेक फौज ठेऊन खाशी फौजसुद्धां आह्मी चालोन गेलों. लढाई ज्याहत जाहली. कर्नलबेली याचे फौजेस कतलाम

* या पत्रांतील पुष्कळ यवनी शब्द आम्हांस समजले नाहींत. या पुढें कदाचित लिहितांनाही अशुद्ध लिहिले गेले असतील.

१ ईश्वर तुम्हास सुरक्षीत ठेवो. २ हा शब्द पोर्तुगिज लोकांस लावण्याचा सांप्रदाय आहे परंतु या पत्रांत तो इंग्रजांस लावलेला दिसतो ३ जमाव ४ स्वतःची ५ मोठी हकूमत करी.

केले. खुद्द कर्नलवेली सरदार व मातबर मातबर पालखीनशीन तीस सरदार व गोरे फिरंगी पांचशें. हे जीतें शाबूद इकडे पाडाव आले. पांचशें फिरंगी, व दोन हजार बार, कतल करण्यांत आले. बाकी बार, व कुल बंदुका व बारा तोफा वगैरे कुल त्याचें लष्करचें लष्कर कुल त्याचें लुटून घेतलें. हे खबर जनराल मंडोर याणें कंचीस ऐकोन घाबरा होऊन आपले हमराई फौजेसुद्धां रातचेवक्तीं फरारी जाहला. सबब इकडून भारी फौज पिच्छास लाविली. तेव्हां यांस त्यास लढाई होऊन जनराल मजकूर याचे हमराई होते निष्फ जमियेत मारून घेतली. जनराल मजकूर ताबा आणूं न सकतां आपले हमराई तोफा, व रणगाडे, व बारुदच्या पुरज्या ( ? ) व वहीर ( ? ) वगैरे कुल सरंजाम टाकीत टाकीत, दोन तीन हजार जमियेतनशीं कंचीहून आठ कोसांवर चंगलपटनामें त्याची गढी आहे, त्या गढीचे आश्रयास जाऊन पोहचला. इकडील फौज ताकुबावर होती. त्या फौजेनें गढीस जाऊन घेरलें आहे. खुदाजे फजलकडून त्याचेही तंबी अनकरीबच होईल तें कलमी करण्यांत येईल. खुलसयाबाद, चेनापट्टण, वगैरे मकाणें, व इंग्रजाचे मुलखाचा बंदोबस्त व त्याचे जमियेतचा हवाल जो होईल तो जहुरींत येईल. इकडील साहाशें घोडे व दोन बक्षी, व दोन तीनशें खासे कामास आले. मुजोका नाहीं. आपण दोस्त असा याकारितां येथें ज्या प्रकारें लढाई झाली. त्याच नक्षाप्रमाणें मुफसल लेहून पाठविलें असे. परभारें अखबारे वरून ही मालूम होईल. हमेशा आपली शादमानी कलमी करून दीलशाद करीत यावा. जादा काय लिहिणें असे.

---

१ जिवंत २ सर्व ३ हुजार ४ अर्धी ५ दारु ६ मेहरबानी ७ लवकर ८ जाहीर ९ फिकीर १० तपशीलवार ११ खबरेवरून १२ समजेल १३ कुशलवृत्त १४ खुशी

# भाग ४

## नानांचे किरकोळ महत्वाचे लेख.

**अहह महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः**

(भर्तृहरी—नीति शतक.)

वरील तीनही भागांत ज्या लेखांचा समावेश करितां आला नाहीं. असे नानांचे महत्वाचे लेख या भागांत देण्याचें योजिलें आहे. हे वाचले असतां, प्रत्येक लेख नानांच्या निरनिराळ्या गुणाचा व्यंजक आहे असें दिसून येईल. या भागांतील एकंदर लेखांविषयीं येथें विशेष लिहिण्या सारखें कांहीं नाहीं. पुढें प्रत्येक लेखाचे प्रसंगीं आम्हांस जें ल्याहावयाचें तें लिहूं.

नानाचे ठिकाणीं स्वामीभक्ति कशी पूर्णत्वं करून वास करीत होती. तें पुढील पत्रांत पहा.

---

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंति उपरी मोजे वेळास[1] हा गांव आमचा वतनी आहे. तो इंग्रजाकडे कोंकणांत बाणकोटाखालीं आहे. तो सोडून घ्यावा. असें मनांत होतें. परंतु साष्टी सरकारचीं सुटली नसतां आपला गांव सोडून घ्यावा हें ठीक नाहीं. तुह्मांस कळावें म्हणून लिहिलें आहे. रा॥ छ १२ रमजान हे विनंति.'

या पत्रावरून 'सर्वस्वहानि सोसे प्रभु हानि "कुलज मना सहावेना' या पंतवाक्याची यथार्थता तेव्हांच निदर्शनास येते.

नानांचें राज्यकारस्थानीपणारूपशास्त्र किती लखलखीत होतें तें पहा.

---

१ हा गांव कोंकणांत बाणकोटाजवळ आहे. नानांचे पूर्वज पूर्वी याच गांवचे राहणारे होते.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंति उपरी हैदरखानाकडील एक कारकून, व पांचसात जोड्या हरकाऱ्यांच्या राजश्री पाटीलबावांकडे जावयाकरितां आल्या आहेत. त्यांणीं तेथें जाऊन हैदरखानाकडे बातमी बरचेवर लिहून पाठवावी. या करितां हैदरखानानें पाठविले. त्यांणीं दस्तक येथील मागितलें तेंही दिल्हें. तो कारकून, व हरकारे, पाटीलबावांच्या लष्करांत येतील. राहुटी राहुटीस घरोघर फिरतील. कोण काय बोलतो ( फाटलें आहे. ) हें सविस्तर पाहून ( फाटलें आहे. ) लिहून पाठवितील. या करितां याचा बंदोबस्त असावा तेथील दरबारची रीत तुम्हांस माहीत आहेत. ज्याणें जसें पाहिजे तसें बोलावें बाहेरल्यास त्याचा अर्थ काय समजतो? बातमीदारांच्या लिहिण्यावरून हैदरखान भलतेच तर्क काढतील. या करितां उत्तम पक्ष तर कारकून व हरकऱ्यांस एक जागा नेमून द्यावी. आणि ताकीद करावी कीं, शिधापाणी मात्र बाजारांतुन आणीत जावें. वरकड कोणी कोठें जाऊं नये. फिरूंनये. दरबारास बलाऊ पाठवावें तेव्हां कारकुनानें येत जावें तेंही खाशांशीं अथवा भाईशीं बोलत जावें. या प्रमाणें करून पांचसात माणसें त्याजजवळ इतबारी ठेवावीं. त्यांणीं या प्रमाणें राखीत जावें. हें उत्तम. अथवा आपल्या दरबारचा सारा बंदोबस्त चांगला करून राहतील तेथें राहूत जातील तेथें जाऊत. हा एक पक्ष; परंतु हा पक्ष घडावयाचा नाहीं. वर लिहिला हा पक्ष घडावा. याप्रमाणें राजश्री पाटीलबावांस सूचना करावी. येथें हैदरखानाचे वकील आहेत त्यांशीं पाटीलबावांकडील दाब व मसलतीची आंगेजनी व एकत्व, हेच भाव बोलण्यांत येतात तुह्मास कळावें ह्मणून लिहिलें आहे. येथील दुसरा अर्थच नाहीं. तेथेंही लिहिल्याअन्वयें घडावें हे विनंती '

या पत्रावरून स्पष्ट दिसून येतें कीं. पाटीलबावांचें व आपलेमध्यें वैमनस्य आहे. हें तिऱ्हाईतास कळूंनये असे विषयीं नाना फार जपत असत. याच आशयाचें, परंतु कडकपणानें लिहिलें दुसरें पत्र पहा.

---

' राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंती उपरी राजश्री पाटीलबावांचीं बोलणीं विक्षेपाचीं तेथें होतात. त्या-

चीं लिहिलीं लोकांचे घरीं इकडे येतात. तेव्हां इंग्रजांचेही घरीं बातमी जात असेलच. हीगोष्ट मसलतीस वाईट. हें ध्यानांत येतें कीं नाहीं? रती इतकी दरज पडली असतां शत्रूस बल कितीयेतें याचा विचार करतात कीं नाहीं ! त्यांत हीं कोठें वांकडें असलें तरी थोर आहेत ते वाकडे दाखवीत नाहींत. मग येथें तर परस्परें भाऊपणा अकृत्रीम. वांकडे रतीमात्र नसतां, उगीच कोते अंदेशे माणसाच्या लिहिण्यावरून व सांगितल्यावरून निःकारण विपरीत अर्थ करून बोलावें हें तर फारच विलग दिसतें. व या गोष्टीपासून उमेदही सरत. अगर बोलण्यानेंच संतोष होतो तर एकांतीं तुह्मांस बलाऊन नेऊन जें बोलावयाचें असेल, ते बोलन जावें. दुसऱ्यास करूं नये. असें तरी व्हावें. एवढे मोठे सरदार मसलतीवर गेले त्यांस जेणें करून उपयोग त्याच गोष्टी येथून घडत असतां राजश्री पाटीलबावांची पत्रें येतात. त्यांत एक पत्र तरी—जाहिराणा दरबारांत सर्वांचे वकील बसले असतां वाचून पाहावें आणि शत्रू व बाहेरील आहेत, एकत्वाचा व स्नेहाचा ( मजकूर ) ऐकल्यावर दात पडावा, व इष्ट आहेत त्यांस गोड वाटावें. असें पत्र कधींच येऊन पाहिलें नाहीं. जीं पत्रें येतात त्यांत मनांत कल्पना नाहींत, व न यावयाच्या त्या घेऊन व कितेक गोष्टी करून व कित्येक विपरीत अर्थ करून लिहून येतात. तीं एकांतीं वाचावीं त्यांचे पाऱ्हे उत्तरें लिहून तुह्मांकडे पाठवावीं याखालींच दिवस गेले. पुढें ईश्वरी इच्छा असेल तसें घडेल. हाळकरांकडील मजकूर पत्रीं लिहितां. परंतु प्रस्तुत मसलतीचे दिवस. वाटेंत लुटारूही फिरतात. एखादें पत्र त्यांकडे गेल्यास तूर्त मसलतीस अपाय. या करितां पत्र पाठविणें तें तजविजीनें पाठवीत जावें ' पाटीलबावांचें पारिपत्य जाहलें तरी सरकारकाम ' अशा गोष्टी जेव्हां पाटीलबावांच्या मनांत येऊं लागल्या त्या परिहार लिहितां कशा जातील. ईश्वरच त्यांच्या बुद्धीस काय साक्ष देईल ती खरी. अशीं विक्षेपाच्या मजकुराचीं पत्रें वाटेचे गर्दीमुळें इंग्रजाकडे धरलीगेलींअसल्यास काय मनांत आणतील ? याचाही विचार करावा. तुह्मांकडून पत्र जासूद घेऊन आला ह्मणजे कधीं लखोटे फोडण्यापूर्वीं चित्तांत येतें कीं काय नवा विक्षेपाचा ग्रंथ रचला असेल ! मग फोडून पत्रें पाहणें तों तेंच निघतें. बरें आहे. कितीही वाईट वाटावयाजोगें बोलले, व लिहिलें तरी आह्मी चित्तांत वांकडे

काडीभर आणणार नाहीं. एकतर आह्मी शुद्धबुद्धीनें पाटीलबावांचे ठांई चालणारे, दुसरें खावंदाचे कार्यावर नजर, मग वाईट कशाश वाटेल. रा। छ २४ जमादिलाखर हे विनंति.'

शिंद्यांचेमार्फत इंग्रेजांशीं पेशव्यांचा जो तह ठरत होता, तो आपले मार्फत व्हावा. असें नागपूरकर भोंसले, व नबाब, यांचे आग्रहपूर्वक ह्मणणें होतें. परंतु अनेक कारणांस्तव, उभयतांचें बोलणें बाजूस ठेऊन, नानांनीं महादजीचेच मार्फत तह करण्याचें ठरविलें. हा प्रकार भोंसले व नबाब यांस सहजच आवडण्यासारखा नव्हता. व त्यामुळें त्या उभयतांनीं पुणें दरबाराबद्दल वैराग्य धरणें स्वाभाविक होतें. उभयतांचे इच्छेविरुद्ध शिंद्यांचेमार्फत तह ठरवून पुन्हा दोघांचीही मर्जी सुप्रसन्न ठेवणें साधारण बुद्धीचे मनुष्यास शक्य नव्हतें. परंतु दोन्ही गोष्टी साधण्यास नानांनीं काय शक्कल योजिली ती पहा.

---

'राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंति उपरी सरकारांतून तह इंग्रजांशीं नबाबास व भोंसल्यास न कळवितां केल्यास दोघेही उदास राहून वाकड्याही चाली धरतील. तसाच मनसुबा पडल्यास हैदरखान व नबाब ही एक व्हावयास चुकणार नाहींत. व कित्येक गोष्टीस वाईट पडेल. कदाचित् पाटीलबावा ह्मणतील कीं 'दोघांचेंही विचारें नक्षा ठरला असतां एकतर पैका घेऊन माघारे आले. एक घरींच स्वस्थ राहिले. मसलतीस परीक असते तर त्यांस घेऊन करावें, तें नाहीं. मसलत सरकारावरच पडली. तेव्हां सरकारांतून तह केला यास वाईट त्यांनीं कां मानावें'? त्यास एक गोष्ट त्यांस बोलावयास आहे. कीं इंग्रेज आह्माशी बहुत नफे बोलत होते. परंतु आह्मी श्रीमंतांचे दोस्ती करितां कबूल केले नाहींत. व आंतून बातम्याही मनास आणितां, इंग्रज नबाबांशीं बहुतां रीतीनें बोलत होते! परंतु श्रीमंतांच्या दोस्ती करितां इंग्रजाशीं गुंतले नाहींत. असेंच आहे. यास्तव परभारेंच सलुख केला असतां वाईट मानतील असें आहे. घेऊन केलें असतां उपयोगी पडेल. इंग्रजांचा तह करण्यास हैदरखान तुटतो. या करितां नबाबाचे मक्त्याचे रुपये दरसाल इंग्रजाकडे येण्याचा करार आहे व

इंग्रजही देत असतात. परंतु आपण तहनाम्यांत कलम ल्याहावें कीं 'नबाबाचा मक्ता सालदरसाल तुम्हांकडे करार आहे. त्या प्रमाणें देत जावा.' तसेंच भोंसल्याचीही चौथ बंगाल्याची देत जावी. या प्रमाणें तहनाम्यांत इंग्रजांशी बोलून, जरूर ल्याहावें. येणें करून नबाबास व भोंसल्यास गोड वाटेल. यांत इंग्रजांचेंही कांहीं जात नाहीं. राजकारणास उपयोगी पडेल. रा छ १२ रमजान हे विनंति.'

ही एक शकल झाली याच मुद्यावर नानांनीं दुसरी शकल काढली ती पहा.

---

'राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी.

विनंति उपरी नबाब व भोंसल्यास कसें कळविणार. कसें करणार हें कांहीं लिहिलें नाहीं. असें पाटीलबाबा ह्मणतील तर याची तोड योजिली आहे कीं इंग्रजांशी तह पाटीलबावांनीं पक्का गुप्त करून येथें लिहून पाठवावा. आणि त्या यादीची नक्कल येथून एक नबाबांकडे व एक भोंसल्याकडे लिहून पाठऊन पत्रें येथून लिहून पाठवावीं कीं 'इंद्रसेन पाटीलबावांकडे आला. तो सरकारचे मुद्दे या प्रमाणें बोलतो. याचें उत्तर काय ल्याहावें ?' कदाचित ह्मणाले कीं याहून आमचे हातून केल्यास नफे अधिक करून देऊं. तर त्याची मुदत महिन्या दीड महिन्यांत काय नफे अधिक करून देतात. असें तर्फे वकील असतील त्यांणीं (सांगावें.) इंद्रसेनानें कौल करार येथें केला असतां याहून मुद्दे यांचे विद्यमानें इंग्रज अधिक करणें हे गोष्ट कळतच आहे. तेव्हां याहून अधिक होत नाहीं. असें सांगतील. मग केल्यास त्यांस संतोष राहून केलें असें होईल. ही एक तोड कळावयाकरितां लिहिली आहे. रा छ १२ रमजान हे विनंति.'

महादजी शिंद्याचें मन न दुखवण्याबद्दल नाना किती जपत होते तें पहा.

---

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री
पांडुरंगपंत स्वामीचे सेवेसी.

पोष्य बाळाजी जनार्दन विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय

लिहीतजावें. विशेष राजश्री नारो शिवदेव यांस येथून पत्रें पाठवीत असतो. त्यांत राजश्री पाटीलबावांचे चित्तास वाईट वाटावयाजोगें वर कांहीं लिहीत नाहीं. तथापि त्यांच्या समजेस एखादें वाईट वाटतें. त्यास पेशजी एकवेळ नारोपंतांस लिहिलें होतें कीं, जें पाटीलबावांचे चित्तास वाईट वाटावयाजोगें असेल ती पुरवणी दाखऊं नये. मजकूरच तोंडानें बोलत जावा. याप्रमाणें लिहिलें असतां मध्यें एखादेवेळेस पत्रें दाखविल्यावर वाईट वाटून उदासीनतेचे भाव तुमच्या लिहिण्यांत कां येतात? असें हल्लीं लिहिलें तरी पाटीलबावांस संतोषवाटावयाजोग्या पुरवण्या असतील त्या वाचून दाखवीत जाव्या. कदाचीत् एखादे पुरवणींत त्यांस वाईट वाटावयाजोगें असल्यास ती पुरवणी दाखऊं नये. मजकूरच तोंडानें त्यांस संतोष वाटे असा बोलत जावा. राा छ १२ जमादिलाखर बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती.

याच मुद्यावरील पुढील उल्लेख वाचा.

'सरकारचा ऐवज राजश्री पाटीलबावांकडे येणें. याचें उत्तर पूर्वीं लिहून पाठविलें आहे. राजश्री रावोपंत गुरूजी येथें आहेत, सरकारचा ऐवज किती होतो तें रुजुवातीनें याद करावी ह्मणून लिहिलें त्यास रुजुवातीनें यादकरतों. परंतु याची एखादी वरात केल्यास फलाणे मुदतीस देऊं. अशी कांहीं तोड पडावयाजोगीअसल्यास लिहून पाठवावें. मसलतीवर राजश्री पाटीलबावा गेले असतां लिहूं नये. परंतु सरकारांत लांचारी व वरात ही करावयास कोठें जागा राहिली नाहीं याकरितां लिहिलें आहे.'

सरदारांनीं योग्यमर्यादेनें चालावें अशाबद्दल नानांचा किती कटाक्ष होता तो पहा.

---

राजश्री नारोपंत स्वामीचे शेवेसी.

विनंती उपरी 'रावेमल्हार याजकडे पाटीलबावांची दिवाणगिरी झाली. सर्वप्रकारें सरकार लक्षांत राहवें, अंतर करूं नये, स्वामीचे अभय पत्र यावें. ही इच्छा बहुत आहे यास्तव विनंती लिहिली आहे. कृपाकरून पत्राविषयीं आज्ञा करावी,' ह्मणून लिहिलें त्यांस त्याचें पत्र अगोदर

१ पैक्याची ओढ.

आह्मांस यांवें मग आह्मी उत्तर लिहावें. हा मार्ग असतां आह्मींच पत्र पाठवावें ह्मणोन लिहीलेंत, हें अपूर्व वाटलें. सर्व प्रकार सरकार लक्षांत राहणार. उत्तम आहे. तुह्मी ही त्यांची खातरजमा केलीच आहे. करावीं रा छ सवाल हे विनंती.'

पुढील पत्रांत नानांची दक्षता कशी स्पष्ट दिसत आहे पहा.

---

राजश्री नारोपंत स्वामीचे शेवेसी.

विनंती उपरी तुह्मी छ ३ मोहोरमचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं.

राजश्री पाटीलबावायांनीं शिकवार तालुक्यांत गढ्या सोडऊन तेरधार (?) तालुक्यांत स्वारी आली. इकडील ही कांहीं गढ्या सोडविल्या. राहिल्या त्याही सोडवितात. राणा गोहदेस आहे. त्याजकडील जमियत भेदोर दतीयेकर उठोन गेले. वगैरे लोक इकडे येऊन चाकरीस राहिले आहेत. प्रस्तुत राण्याजवळ जमियत आहे. त्यांसही पोटांस मिळत नाहीं. याप्रमाणें त्याची अवस्था आहे. ही मसलत सिद्धीस गेल्यावर दतिये काराचे पारिपत्य करावें असा मनसबाहि बोलतात.' ह्मणोन लिहिलें तें कळलें. त्यास राण्यापासून भेदोर दतियेकर उठोन गेले, उत्तम झालें. कांहीं इकडे येऊन चाकरीस राहिले आहेत, ते राण्याचे अनुसंधानें करून राहिले नसले ह्मणजे बरें. याचा शोध करूनच चाकरीस ठेविले असतील. पुढें होईल तें वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावें. रा छ १ रविलावल हे विनंती.'

## खालील मौजेचा जाबजबाब वाचा.

शिंद्याकडील वकिलाचें लिहिणें
' +लग्नाचीं वस्त्रें भाई वगैरे यांस आलीं. राजश्री माधवराव गंगाधर यांस आलीं नव्हतीं. यास्तव बा-वांनीं त्यांस वस्त्रें देऊन, सरकारचीं वस्त्रें देतों म्हणून बोलले, '

त्यांवर नानांचें उत्तर.
' माधवराव गंगाधर यांस श्रीमंतांचे लग्नाचीं वस्त्रें, सरकारचीं आलीं नव्हतीं. त्यावरून पाटीलबावांनीं येथें त्यांस वस्त्रें सरकारची म्हणून दिल्हीं. म्हणोन लिहिलें त्यास सरकारचीं वस्त्रें ज्यांणीं आहेर केले होते त्यांस दिल्हीं. त्याजबराबर राजश्री दादाजी गंगाधर यांसही दिल्हीं ' ( अर्थात् माधवराव यांणीं आहेर केला नाहीं सबब त्यांस वस्त्रें पाठविलीं नाहींत. )

' कोंडाई बारीवर छावणी करावयाची असल्यास विमनस्कतेचीं पत्रें लिहूं नयेत. फार गोड येत जावीं'

' विमनस्कतेचीं पत्रें येथून लिहिण्यांत येत नाहींत. तुम्हाकडून निर्मळ वृक्ष उभे होऊन येतात. त्यांचीं उत्तरें मात्र सरळ रीतीनें लिहित गेलों. कोंडाईबारी वरील छावणी करितांच गोड ल्याहावें, नाहींतर गोड लिहूं नये. असा भाव येथें नाहीं. मुळींच गोड आहे तेथें गोडच लिहीत गेलों व लिहीत जाऊं. '

' येथून पेशजीं कलमबंदीचे यादींत लिहिलें होतें कीं ' दरम्यान तहास राजश्री पाटील बावा ' म्हणून कलम लिहिलें आहे. त्यांत सामील होऊन

येथून असें लिहिलें होतें याचें कारण कीं तहनामा कोठेंही जाऊन, कोणीही पाहिला तरी वाईट न दिसावें याकारितां लिहिलें. केवळ पाटी-

---

+ श्री० सवाई माधवरावसाहेब यांचे लग्नाचीं. १ पाटीलबावांनीं.
* इंग्रजाशीं ठरत असलेले तहासंबंधानें कलमबंदीबद्दल हा मजकूर आहे

असें लिहिलें आहे, इतकें मात्र नसावें. वरकड बरें आहे. याचें उत्तर पाटीलबावांनीं केलें कीं याविशींची काळजी न करावी. त्या कलमांत पुढें दरज राखिली आहे. यादींत लिहिलें तरी आम्हांस बदमामली सरकाराशीं करावयाची नाहीं.'

'कालचीं पत्रें श्रीमंतांचीं आलीं, तेव्हांपासून मर्जी ठीक नाहीं.'

लवावा बद मामली सरकाराशीं करतील. याकारितां लिहिलें असें नाहीं. याचें उत्तर पाटीलबावांनीं केलें तें तुम्हीं लिहिलें, त्यास त्याचा अर्थ असा नाहीं. तितकीं अक्षरें नसल्यास उपयोगी हें जाणून लिहिलें होतें. त्याप्रमाणें तहनाम्यांत 'सामील होऊन' इतकें लिहूं नये. वरकड लिहिलें तें बरें आहे. त्यास बरें दिसेल ते करतील.'

'मर्जी ठीक न दाखऊन सरकार काम चांगलें घडत असल्यास उत्तम आहे.'

स्वदेशीय राजांस होईल तितकी मदत करून, परदेशी यांचा पाय होता होईल तेथपर्यंत, पुढें शिरूं द्यावयाचा नाहीं असा नानांचा निर्धारहोता. पुढें पाहा:—

* चेतसींग राजा पांच हजार फौज व पंन्नास हत्ती, खजीना, घेऊन बिजेगडास कुटुंब ठेऊन रेवा मुकुंदपुरास आला तेथून मुजरत पत्रें राजश्री पाटीलबावांस पाठविलीं. राजाचें मन फिरोन जमाव करून इंग्रजांवर जावें. पाटीलबावांकडे वकील रवाना केला, 'तो आल्यावर कांहीं पैक्याची तोड पडल्यास, त्या प्रांतीं जावें. असा विचार दिसतो, ह्मणोन विस्तारें लिहिलें त्यास अमानी (?) इंग्रजास मिळाला व फितुर चेतसिंगाचे फौजेंत झाल्यामुळें राजा हलका जाहला. यामुळें निघाला परंतु हिंमत आहे. अशा समयीं त्याची कुमक करून इंग्रजाचें पारपत्य करावें. केवळ पैक्यावरच दृष्ट ठेऊं नये. मसलतीवर नजर ठेऊन करावें. समय आहे.'

'हेष्टीन काशीहून निघून कलकत्यास गेला. त्यांतील आशय इंद्रसेनास ठावका असले. याचा शोध करून लिहून पाठवावें. म्हणून येथून लि-

---

* हा काशीचा राजा इंग्रेजांचे वर्चस्वामुळें काशींतून पळाला होता.

हिलें होतें त्याचें उत्तर लिहिलें कीं, येथें शोध केला. इंद्रसेनाच्या बोलण्यांत हेष्टीन काशीच्या कार्यभागानिमित्त आला होता तो उरकल्यावर मग कशास रहावें ह्मणून माघारा गेला. काशीहून लोक येतात त्यांच्या सांगण्यांत, हैदरखानाचा ताण भारी बसल्यामुळें, अंतरवेदींतील सारा जमाव घेऊन माघारां गेला असें आहे. इकडील मसलतीवर पाटीलबावा आहेत हे अंतरवेद खालीं पाहिली असतां चाल करतील. याजकरितां इंद्रसेन सलुखाचें बोलणें बोलण्यास पाठविला म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास हेष्टीन मातबरच मनसबा करावयास काशीस आला होता. परंतु हैदरखानाचा ताण व फराशिसांचें येणें यामुळें गेला. इकडील समारोप केला असें दिसतें.'

'इंग्रजांचा जमाव चेनापट्टणाकडे भारी असतां, हैदरखानानें जरब चांगली बसविली. इंग्रज चेनापट्टणाकडे गेले, फराशीसही येणार. काशीकर राजाची व आपली भेट झाली. पातशहा, नजफखान यांचीं राजकारणें आहेत, तीं पक्कीं करून हेष्टीन काशीस आहे त्याचें पारपत्य केलें असतां, मसलतस शेवटास जाते. आपण मन घालून मसलत केली असतां मोठेंच यश येण्याचा समय आहे. ही मसलत पुढें जाऊन करतात. असा सिद्धांत ठराऊन पत्र पाठवावें. पत्र पावतांच इकडील ओढ सोसून पांच सात हजार फौज पाठऊं हा मनसबा फार चांगला.'

नाना, सप्तसमुद्रापलीकडील बातमी कशी काढीत ती बघा.

'विलायतेस फराशीस व वलंदेज, व पर्तकश. तिघे टोपी वाले एक झाले आहेत असें ऐकतों. श्रीमंतांच दौलतीचें ओझें पाटीलबावांवर. यास्तव त्याचें पूर्तपणें मनन करून पाटीलबावांनीं ल्याहावें.'

आतां निरोनिराळे पत्रांतील मजेदार चुटके खालीं देतों:—

श्रीमंतांचे पाय ध्यानांत आणून, स्वच्छ अंतःतरणें संदेह सर्व शफतपूर्वक टाकून देऊन इंग्रजांचें पारपत्य पूर्वीं मसलती लिहिल्या त्यांतून कोणता ठराव करणें तें करून आपआपले कामावर जाऊन निकड करावी.'

'सरकारचीं कामें जाहीराणा चांगलीं दिसत अशीं आहेत. ते केली ह्मणजे सहज लोकांचेंही संदेह जातील.' 'घरांतील गोष्ट तर एके आईचीं लेकरें. संदेह टाकले ह्मणजे स्वच्छताच आहे. नवें जडणें लागतच नाहीं. 'अशाच कल्पना व संदेह घेऊन दौलतेचा नाश

जाहला. पुढेंही ईश्वरें निर्मिलें असेल तसें घडेल. यास आमचा व तुमचा उपाय काय ?—ज्यांत सरकारकाम चांगलें होय तें करावें.'

'सर्वांनीं मिळून सरकार रक्षावें तरी सर्वांची शोभा राहील असें समजावें'.

'सर्वभार पाटीलबावांवर याउपरीही संदेह येऊं लागल्यास, दौलत राहत नाहीं. अशीच ईश्वरी इच्छा ह्मणावी.' 'राजश्री पाटीलबावा श्रीमंतांच्या पायांशीं एकनिष्ठ. व आमचा भाऊपणा अकृत्रीम. बरें वाईट सांगावयास जागा इतकीच. असें जाणून लिहिलें आहे. सर्व सांभाळणें राजश्री पाटीलबावांकडे आहे. भारही त्यांवरच आहे.' 'परस्परें सुखादुःखाचे सोबती पाटीलबावा व आह्मी खावंद एक. त्यांत भाऊपणा. खावंदांच्या चाकरीवर एकनिष्ट. त्यांत क्रियाही जाहली त्याप्रमाणें परस्परें करण्यांत येतें. तेव्हां दगा फटक्याची शंका तुमचे चित्तांत घेऊन कसें लिहिलेंत.'

'परिणाम दौलतीचा ईश्वराधीन आहे. आमच्यानें होईल तेथवर करतों. ईश्वरी इच्छा असेल तशा बुद्धी सरदारांस होताल.'

'थोर आहेत त्यांचें लिहिणें बोलणेंच प्रमाण असतें. व त्या विश्वासावरच मोठीं कामें होत असतात. व ज्या मर्यादा आहेत त्या चालविल्या असतां कल्याण होतें.' ज्यांत श्रीमंतांचे दौलतीचें कल्याण ती गोष्ट करावी.' 'हीच इच्छा कीं सरळ बोलावें, सरळ करावें, खावंदाची—दौलत रक्षावी. यांतच पुण्यपुरुषार्थ आहे.'

आतां चमत्कारिक मजकुराचे कांहीं लेख खालीं दाखल करितोंः—

'सुरतेंत अद्भुत वायु सुटून घरें दारें पडलीं हें वर्तमान विलातेस गेल्यावरून कौसल झालें, त्यांत आपली बेमानी असें जाणून हेष्टिनास फाशी द्यावें असा निश्चय झाला. त्यावरून हेष्टिनास घेऊन जावयाकरिता मेस्तर हामपस जावल (?) पाठविले आहेत. त्यासी हेष्टिन बोलतो कीं आतां मी श्रीमंतांशी वगैरे विरुद्ध वाढवीत नाहीं. सलूख करतों, व काशीच्या राजाची स्थापना करतों. याप्रमाणें वर्तमान आलें. सत्यमिथ्या श्री जाणें. परंतु काशीच्या राज्याच्या घरीं कलकत्याहून पत्रें आलीं आहेत. त्यांत तुमचे काम तुह्माकडे सांगून स्थापना पूर्वंत करावी. याप्रमाणें निश्चय होतो ह्मणून आलीं काशीहून पत्र आलें कीं, हेष्टिनानें

काशींत राजाची स्थापना केली होती त्यास कैद केलें. त्यावरून कलकत्याची बातमी खरी असेलसे वाटत. मुंबईस जनराल विलायतेहून दुसरा आला. त्यानें बंदोबस्त करून, मागील जनराल यास फांशी दिलें. व सुरतेस सातहजार माणूस मुंबईहून आलें, तें सुरत वगैरे गुजराथेंतील बंदोबस्त करणार ह्मणून पायागडाहून पत्र पाटीलबावांस आलें. ह्मणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास कलकत्याची बातमी खरी असल्यास याचा अनुभव पाटीलबावांस लौकरच येईल, कीं पाटीलबावा जसें ह्मणतील तसें इंग्रज कबूल करतील. मग कलकत्याचें वर्तमान खरें असें मानण्यांत येईल. हैदरखानाच्याही तहाचें बोलणें हैदरखानाचा तह होणें तो सरकाराचे विद्यमानें व्हावा. हे इंग्रजाशीं बोलून करारांत आणावें. मुंबईचें वर्तमान पायागडाहून पत्र आलें ह्मणून लिहिलें, परंतु ही बातमी खरी असती तर येथें ही बातमी-समजती. ह्या बातम्या खऱ्या नाहींत कलकत्याची बातमी येथें येते. त्यांत हें कांहीं नाहीं व मुंबईचीही नाहीं.'

'इंग्रजांनीं मुंबईत दंवडी पिटली कीं श्रीमंतांचा व इंग्रजांचा तह झाला व कल्याण बेलापूर वगैरे जागेचा जिनस झाडून व घराचे इमारतीची लांकडें देखील मुंबई साष्टीस नेतात. व तमाम कल्याणापासून देखील माहालचा वसूल रयतेपासून फार निकडीनें होईवर धोंडे देखील देऊन नेतात. याप्रमाणें बातम्या चहूंकडील आल्या. व येत आहेत. त्यास तह होऊन स्नेह झाला असतां अशा गोष्टी इंग्रजांनीं करूं नये. हें वर्तमान तुह्मी राजश्री पाटीलबावांस सांगावें.' 'संगमरवरी दगड या दिवसांत चांगला निघत नाहीं. पर्जन्यकाळीं काढले तसे मिळतात. याकरितां पर्जन्यकाळीं श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें दीड गज लांब व गजभर रुंद व अर्धा गज तीन तसू जाड याप्रमाणें पाठऊन देऊं. याप्रमाणें पाटीलबावांनीं सांगितलें ह्मणून लिहिलें. व दुसरी बातमी लागली कीं, धारेजवळ मांडवगड किल्ला आहे. तेथें पातशाही इमारत संगमरवरी दगडाची आहे. व दगडही मोठाले आहेत. वर लिहिल्याप्रमाणें तेथेंही मिळेल ह्मणून लिहिलें त्यास तेथेंही शोध करावा. व तुह्मी वर लिहिल्याचन्वयें पर्जन्यकाळीं दगड जरूर पाठवावा. संगमरवरी दगडांस तिकडे उणें नाहीं लौकर पाठविल्यास येईल परंतु आमचें काम याकरितां कसें होईल पाहवें.'

येथवर नानांचे उज्वल गुण दर्शित करणारे, बहुतेक लेख नमूद केले. आतां त्यांचे अंगीं जो एक मोठा दोष होता कीं, जेणें करून ऐन आणी-बाणीचे प्रसंगीं त्यांचे सर्व गुणांवर पाणीं पडून खुद्द त्यांच्या व त्यांचे देशाचा पुरा नाश झाला. तो दोष दर्शित करणारेही त्यांचे कांहीं लेख येथें उतरून घेतले पाहिजेत. हा दोष ' भीरुता ' ह्मणजे भित्रेपणा हा होय. मोठ्यामोठ्या प्रत्येक मसलतींत, पुढें काय होईल कोण जाणे, असें नानांस नेहमीं भय वाटे. व त्यामुळें त्यांचें वर्तन सदोदीत धरसोडीचें असे. खालील लेख पहा.

---

' राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसीं.

विनंती उपरी राजश्री पाटीलबावांनीं इंग्रजांशीं सलुख करून परस्परें तहनामे दिल्हे घेतले. इकडे तो फराशीस भारी सरंजामानिशीं आले. टिपूनी बिदनूर प्रांतीं हांगामा केला. याउपर उलटून, फराशीस आपण एक होऊन चेनापट्टण घेतलें तर मसलत भारी पडेल. दक्षणेंत इंग्रजांचें मकाण सुरत मुंबई खेरीज नाहीं. कर्नाटक निर्वैर. टिपू व फराशीस एक तेव्हां कसा कल बसेल न कळे. यास्तव याची तजवीज पाटीलबावा काय ठरावितात ? मनसबा कसा करावा ? येविशीं एकांतीं चार घटका निवळ बोलोन पक्का मनसबा काय सांगतात तो लिहून पाठवावा इंग्रजाचा तह ठरला हा एके प्रकारें यासमयीं बरा होता त्यास हल्लीं भारी सरंजामानिशी फराशीस आले ते व टीपु एक. त्यांत दुसरे मातबर कोण कोण मिळतील. अशा तोडणी आहेत. यांत कसा कल बसेल या करतां याचा पुर्ता विचार करून लिहून पाठवावें रा। छ २२ जमादिलावल हे विनंती.

---

' राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसीं.

विनंति उपरी मुसा भुशी फराशीस हैदरखानाकडे इंग्रजाच्या पारपत्याकरतां मदतीस आला. हें वर्तमान पेशजीं लिहून पाठविलें आहे. त्यास सांप्रत त्याजबराबर पंनास जहाजें व बारा तेरा हजार गोरा या प्रमाणें सरंजामनशीं गुडरूळाजवळ आला सरंजाम भारी आहे. या प्रमाणें बातम्या आल्या आहेत. तेव्हां टिपुमिया व फराशीस एक

जाहाले तेव्हां मसलत कशी पडेल पाहवें. वर्तमान कळावया करतां लिहिलें आहे राजश्री पाटीलबावांस कळवावें रा छ १ जमादिलावल हे विनंति. '

फ्रेंच लोकांचा मख्यात सरदार मॉशर बुशी यानें नानांस दोन पत्रें पाठविलीं होतीं, व त्यांच्या नकला करून पाटीलबावांस दाखविण्या करितां नानांनीं नारोपंताकडे त्या नकला पाठविल्या त्यांतील मजकूर चमत्कारिक असल्यामुळें, त्या येथें उतरून घेऊन हें पुस्तक पुरें करतों.

---

१

' मुसाभुशी याचें पत्र श्रीमंत राजश्री नाना
यांस आलें त्याची नक्कल.

आह्मी तुह्मांस करेविसा ( ? ) हून पत्र पाठविलें त्याचें उत्तर तुह्मी पाठविलें तें आह्मांस गुडलुराचे मुक्कामीं छ १४ रावलाखरीं पावलें. तें वाचून बहुत खुशाल जाहलों. तुह्मी हमेषादोस्त फराशिसाचे आहां. आह्मांस आमचे खावंदांनीं बहुत फौज व सरंजाम मजबूद देऊन या प्रांतीं पाठविलें. कारण इंग्रजास तंबी करून मारून काढावा. आमचे खावंदाचा आह्मांस हुकूम आहे कीं ' हिंदुस्थानांतील सरदार आहेत. त्यांचा मुलूख व किल्ले इंग्रजांनीं घेतले आहेत ते त्यांजपासून घेऊन ज्यांचे त्यास * द्यावे. ' आह्मी तुम्हांस लिहिलें आहे हें खरें मानावें. यांत तफावत पडणार नाहीं. मुसामुतनी यांणीं मुसावणेतें या समागमें पत्रें पाठविलीं, तीं सर्व पावलीं. तीं पाहोन बहुत खुषी झाली कीं ' तुह्मी इंग्रजा समागमें सल्ला करीत नाहीं ' तुह्मी खरें जाणावें कीं, आतां तिकडे यावयाची मोसम नाहीं. मोसम आली ह्मणजे, आह्मी बहुत मजबुदी सरंजामानशीं तिकडे येतों. तुह्मी आह्मी मिळोन इंग्रजास खस्त करून टाकूं. आह्मी आपली फौज व दारूगोळा सारा तयार केला आहे. थोडक्याच दिवसांत आह्मी आपल्याशत्रूवर चालून, चेनीपट्टणावर जातों. आमचा दुसमान आहे त्याशीं लढाई करून तंबी करून जलद तुम्हांस वर्तमान लिहून पाठवितों. जे इंग्रजास

* वाहवा ! ! फ्रेंचलोकांचा इकडे येण्याचा हेतु एकूण हा होताना? शाबास ! बुशी साहेब शाबास !! १ फ्रेंचसरदार. मल्हारसेवर.

सामील होतील त्यासुद्धां तंबी श्रीमंत व आम्ही केली जाईल. तुम्हीही इंग्रजाशा लढाई करावी. मुसामुतनी यांनीं आम्हांस लिहिलें कीं 'श्रीमंत राजश्री माधवराव साहेब यांची शादी झाली.' आमचे तर्फेनें मुबारकबानी करावी म्हणोन मुसा मुतनी यांस लिहिलें आहे. आमची व श्रीमंत कैलासवासी बाळाजीराव यांची बहुत दोस्ती होती. कोलोनल मुसा मुतनी तुम्हापाशी आहेत. ते इतबारी पातशहाचे व वजिराचे व आमचे आहेत. जें आपणांस सांगावयाचें असेल, तें याजजवळ सांगावें. याजला जें सांगणें तें तुम्हांजवळ सांगतील. तुमचे जबाबास आह्मी बहुत आहों. ईश्वर तुम्हांस फत्ते देऊ छ २६ रविलाखर सन सछासससमानीन '

---

२

'मुसाभुसी याचे पत्राची नकल.

जहाममग अपली मरवबत सौकतमाली.

मजलत मुलाज मेहरबान मदारुलमाहाला.

बाळाजी पंडीत जुबला मोहबत हुर.

छ १५ रजबपावेतों जर जागा गइलर खैर अफीयेत जाणोन आपली पाइमानी हमेशा कलमी करवीतं आलें पाहिजे. दिगर—इंग्रजानी बहुत गरमी यत्की करी करून खुपकी तमाम कावीज केले. आणिक करीत जातात. याजकरितां खपकीचे तमाम सरदारांनीं इंग्रजास तंबी करून खपकींतून त्याजला खेरीज करावें. म्हणून—नकप ठराऊन, त्याजप्रमाणें इंग्रजावर चहूंकडून खुपकीवर मोहीम केली आहे. दर्यांत इंग्रजाची जाहाज वगैरे आहे. त्याची बंदीबद्दल फराशिसाची जमियेत पाठविणें. म्हणन मसलत करून नबाब हैदरखान बाहादर नजत मकान यांजकडून फराशिसाच्या पातशहास, व वजिरासही खतें लिहून मुजरत जाहाजें वगैरे पाठविलें. करितां पेशानी मुनसफेन व मुसेदुपमेनबराबर फराशीसाचे जमियतरवाना करुन पाठविले होते. त्यास हल्लीं आम्हांसही सात हजार गोलंदाजसहीत रवाना करून पाठविलें याकरितां आम्हीही गुजराथ येऊन तीन महिने जाले. आम्ही पाहिजे तें सामान सरंजाम

---

१ लग्न. २ आनंद प्रदर्शन. ३ श्री० नानासाहेब पेशवे. ४ तर्फ.

१व तोफखान्याचे बैलावर चारीच घोडे व दरबारी करितां बैल उंटे वगैरे, खर्चास नगंद व खानेचा सरंजाम नबाबफत्तेआछीखां बहादुर यांणीं करून दिल्हा आहे. आम्ही आपली जामियेत, व नबाब मौसुफ याची जामियेतचे ईतीफा याने आनकरीह चेनापट्टणचे मकाण घेऊन इकडील तमाम गारत करून तैसेच मोंबैकडे दर्याचे राहानें मुसासलेन यांस जाहाजांसुद्धां रवाना करून, पाठऊन आम्ही खुषकीचे राहानें येत असों. खुदाचे फजलेकडून मुंबै वगैरे मकाने घेऊन, रावपंडित प्रधान यांचे तालुके मकाना वगैरे इंग्रजांनीं घेतले आहेत. [ ते ] ही सहजांत सोडून दिल्हे जाईल. आम्ही आलो ते पाहून इंग्रज आपले जागा घाबरा होऊन खुषकीचे सरदारांशीं फोडाफोडी करून आपलेकडे करून घ्यावे म्हणून या तजविजेत आहेत. त्याची तजवीज आपण आपले करार मदारावर कायम राहून तिकडे इंग्रजास तंबीं आमलांत येईलसें करावें आमचे व आपले इतिफायानें, इंग्रजाचे नांवनिशाणी नाहींसारिशी नेस्त नाबूद होतील. आणीक बहुवाद नफे होतील. आपण इमामरातीबेन बनाव दूरदेशी आहेत. कलमी करावे असें नाहीं. इंग्रजाकडील गनैरल[१] हमीष्टवीन[२] जनराल मलाकैव[३] अशीर जाहाले आहेत. त्यांस सोडून द्यावें. त्यास कैदं करून ठेविले कडून इंग्रजाकडे रघुनाथराव आहेत. त्यांचा बदला होत आहे. आम्हांस आपले दोस्त जाणोन हमेशा आपली षादमाशी कलमी करीत आलें पाहिजे. ज्यादा काय लिहिणें * असे.'

---

१ नब्रल. २सोबतीनें ? ३ कर्नल ( हे इंग्रजी सरदार कोण ? )

* या पत्रांतील पुष्कळ यवनी शब्द भाषांस समजले नाहींत यामुळें बाळबोधींत लिहितांनाही चुका झाल्याअसतील.